cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१३ | मंगळवार दि.२३ एप्रिल २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### मतदारांची उदासीनता चिंता वाढविणारी

**सत्ताधारी भाजपने एकीकडे 'चार सौ पार'चा नारा देत विकसित भारतासाठी पुन्हा मोदी सरकारचे आवाहन केले आहे तर दुसरीकडे सामान्यांना 'न्याय' देण्यासाठी विरोधकांच्या काँग्रेसप्रणीत 'इंडिया' आघाडीने मतदारांना सत्तापरिवर्तनाचे आवाहन केले आहे. दोन्ही बाजूंनी प्रचाराचा जोरदार धडाकाही उडवून देण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर शुक्रवारी लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी झालेल्या मतदानात मतदार उत्साहाने मतदानासाठी घराबाहेर पडतील अशी अपेक्षा होती.**

## मणिपूरमध्ये ११ बुथवर होणार पुन्हा मतदान

नवी दिल्लीः भारताच्या निवडणूक आयोगाने शुक्रवारी अंतर्गत मणिपूरमधील पाच विधानसभा क्षेत्रांमधील ११ बूथवर घेतलेले मतदान रद्द घोषित केले आहे, पीठासीन अधिकाऱ्यांनी काही बूथमध्ये जमावाने हिंसाचार, गोळीबार आणि इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे नष्ट केल्याचा अहवाल दिला आहे. ईसीआयने जाहीर केले आहे की या बूथवर सकाळी ७ ते सायंकाळी ५ या वेळेत फेरमतदान घेण्यात येईल. २२ एप्रिल रोजी, मणिपूरचे मुख्य निवडणूक अधिकारी यांनी एका निवेदनात सांगितले.

## विदर्भ, मराठवाड्यात गारपीटीचा इशारा



**पुणे। प्रतिनिधी**

विदर्भ, मराठवाडा आणि खानेदशातील काही भागात मंगळवारी विजांसह हलक्या सरी पडतील, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. तर ठिकठिकाणी उष्णतेच्या लाटेचा इशाराही हवामान विभागाने दिला आहे. राज्यातील बहुतांशी भागात उन्हाचा चटका चांगला वाढला आहे. तर काही ठिकाणी पाऊस हजेरी लावत आहे. सोमवारी विदर्भातील काही भागात ◄◄ पान २ वर

# शेतकऱ्यांचे आश्रू पुसण्याची दाणत सरकारकडे नाही

## उद्धव ठाकरे यांची भाजपसह मोदींवर टीका

**अमरावती । प्रतिनिधी**

**राज्यात लोकसभा निवडणुकींची धामधूम सुरू झाली असून प्रचाराचा धुरळा उडत आहे. राज्यात महायुती आणि महाविकास आघाडीचे दिग्गज नेते प्रचाराच्या मैदानात उतरले असून आरोप–प्रत्यारोप केले जात आहेत. यादरम्यान माजी मुख्यमंत्री तथा उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपसह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाना साधला आहे. ठाकरे यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न आणि गुजरातला जाणाऱ्या उद्योगावरून अमरावतीमध्ये जाहीर सभेत सोमवारी (ता.२२) जोरदार टीका केली आहे.**

यावेळी ठाकरे म्हणाले, देशाला १० वर्षात लुटनाऱ्यांकडून देशभक्ती शिकायची गरज नाही. एकीकडे भाजपवाले काँग्रेवर टीका करतात मात्र दुसरीकडे शेतकऱ्यांच्या मुलांच्या हाताला काम दिले जात नाही. शेतीपिकाला भाव नाही. म्हणून शेतकरी आत्महत्या करत आहेत. या शेतकऱ्यांसाठी आपल्या पंतप्रधानांनी दोन शब्द तरी बोलले का? नुसते हे करू ते करू चे आश्वान दिले जात आहे. काँग्रेसने ६० वर्षात काय केले



विचारणाऱ्यांनो आधी तुम्ही १० वर्षात काय केले याचा हिशोब द्या, मग ३० वर्षांचे बघू असा हल्लाबोल ठाकरे यांनी केला आहे. यावेळी गेल्या १० वर्षात किती शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट झाले? किती शेतकऱ्यांना पिक विम्याचे पैसे मिळाले हे सांगा असा सवाल ठाकरे यांनी उपस्थित केला. भाजपवाले आणि पंतप्रधान शेतकऱ्यांच्या घरी जाऊन जेवण करू शकतात मात्र शेतकऱ्याचे आश्रू पुसण्याची दाणत त्यांच्यात नाही, अशी टीका ठाकरे यांनी केली. विदर्भात विकास झाला नाही अशी ओरड सध्या भाजपवाले करत आहेत. याबाबत पंतप्रधान मोदी यांनी देखील प्रचारसभेत टीका केली होती. मात्र आता आमच्या गद्दारांनाच घेऊन राज्यात सरकार स्थापन केल्यानंतर भाजपने विदर्भातील विकासासाठी काय केले? विदर्भाचा कोणता विकास केला? त्यांनी का विकास केला नाही. याचे उत्तर भाजपने द्यावे, असे देखील ठाकरे यांनी म्हटले आहे. शेतकऱ्यांना या सरकारने उपाशी ठेवले असून शेतकऱ्यांच्या शिकलेल्या पोरांसाठी मोदींनी एकतरी उद्योग आणला का? उलट राज्याचे उद्योग गुजरातला नेले. जेथे जेथे जात आहे तिथे ◄◄ पान २ वर

# राज्यात महाविकास आघाडी ३२ ते ३५ जागा जिंकणार!

## बजरंग सोनवणेंचा विजय कोणी रोखू शकत नाही, जयंत पाटील यांनी व्यक्त केला विश्वास

**बीड । प्रतिनिधी**

**देशात शिव–शाहू–फुले–आंबेडकर यांचे विचार आणि संविधान वाचविण्यासाठी प्रचंड प्रमाणात लाट आलेली आहे. महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीच्या ३२ ते ३५ जागा निवडून येण्याचा ठाम विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस–शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी बीड येथे बजरंग सोनवणे यांचा उमेदवारी अर्ज भरल्यानंतर कार्यकर्त्यांशी संवाद साधताना व्यक्त केला.**



या कार्यक्रमाला खा.रजनीताई पाटील, राष्ट्रवादीचे पक्ष निरीक्षक जीवनराव गोरे, शिवसेना उबाठा किशोर पोतदार, राष्ट्रवादी युवक आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष महेबूब शेख, जिल्हाध्यक्ष तथा आमदार संदीप क्षीरसागर, माजी आमदार पृथ्वीराज साठे, बबन गित्ते, फुलचंद कराड, नरेंद्र काळे, संगीता चव्हाण, अजिंक्य चांदणे, धम्मपाल कांडेकर, माजी आमदार साहेबराव दरेकर, माजी आमदार बदामराव पंडित, ईश्वर मुंडे, रत्नाकर शिंदे, परमेश्वर सातपुते, भाई मोहन गुंड, ॲड. गोले, माजी आमदार उषाताई दराडे, सुदामती गुट्टे, शिवराज बांगर, सुशीला मोराळे, पूजा मोरे, विजय साळवे, दीपक केदार, कॉम्रेड नामदेव चव्हाण, गणेश वरेकर, माजी आमदार सय्यद सलीम, माजी आमदार सुनील धांडे, माजी आमदार सिराज देशमुख, अजय बुरांडे, हेमा पिंपळे, शिवाजीराव कांबळे, दादासाहेब मुंडे यांच्यासह इंडिया आघाडीतील सर्व घटक पक्षांचे नेते उपस्थित होते.

### धार्मिक स्थळांचे दर्शन, महापुरुषांना अभिवादन करीत बजरंग सोनवणे यांची उमेदवारी दाखल

बीडः राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व इंडिया इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी सोमवारी दुपारी बीड शहरातील धार्मिक स्थळांचे दर्शन घेऊन व महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करत अत्यंत साधेपणाने आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. बजरंग सोनवणे यांनी बीड शहरात दाखल होताच शहरातील छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन करीत स्व. विनायकराव मेटे यांच्या समाधीचे दर्शन घेतले. शहरातील प्रसिद्ध शहेनशाहवली दर्गा व इतर धार्मिक स्थळांना भेट देवून दर्शन घेतले. त्यानंतर



कुठलेही शक्ती प्रदर्शन न करता उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी बजरंग बप्पा सोनवणे यांच्यासोबत खा.रजनी पाटील, जीवनराव गोरे, शिवसेना उबाठा गटाचे बीड जिल्हा संपर्कप्रमुख किशोर पोतदार, आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सुनील धांडे, माजी आ.बदामराव पंडित, माजी आ.पृथ्वीराज साठे, महेबूब शेख, माजी आ.सिराज देशमुख, माजी आ.सय्यद सलीम, बबनभाऊ गित्ते यांची उपस्थिती होती.

२२ एप्रिल रोजी राष्ट्रवादी काँग्रेस–शरदचंद्र पवार पक्ष आणि इंडिया विकास आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांचा उमेदवारी अर्ज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष जयंत ◄◄ पान २ वर

# स्वाराती रुग्णालयाच्या अपघात विभागात दोन गटात हाणामारी

## १६ जणांवर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयाच्या अपघात विभागात रविवारी (दि.२१) दोन गटात तुफान हाणामारी झाली. अचानक सुरू झालेल्या या हाणामारीमुळे रुग्ण, डॉक्टर आणि रुग्णालय कर्मचाऱ्यांत प्रचंड दहशतीचे वातावरण आहे. स्वाराती रुग्णालयाच्या अपघात विभागात बहुतांशी वेळेस अत्यवस्थ रुग्ण असतात. रविवारी देखील अनेक रुग्णांवर या ठिकाणी उपचार सुरू होते. त्याच वेळी ही घटना झाली. स्वा रा ती च्या सुरक्षा



रक्षकानी वेळीच हस्तक्षेप करून पुढील अनर्थ टाळला.

या राड्यातून १६ जणांवर अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात ३०७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान अंबाजोगाई शहर हे सांस्कृतिक व शांतता प्रिय असे शहर म्हणून सर्वदूर परीचीत आहे.मात्र मागील काही दिवसांपासून शहरात चोऱ्या , हाणामारी ,दरोडे असे प्रकार ◄◄ पान २ वर

## आ.आव्हाड यांना बिष्णोई गँगकडून जीवे मारण्याची धमकी

**ठाणे। वृतसंस्था**

अभिनेता सलमान खान यांच्या घरावर बिष्णोई गँगने गोळीबार केल्याचे प्रकरण ताजे असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार जितेंद्र आव्हाड यांना देखील बिष्णोई गँगकडून धमकीचा फोन आला आहे. दरम्यान खंडणीसाठी फोन करण्यात आल्याचे सांगत जर खंडणी दिली नाही. तर कफनची व्यवस्था करावी, असेही धमकावले असल्याचे माहिती आमदार आव्हाड यांनी दिली आहे.

सोमवारी दुपारी जितेंद्र आव्हाड हे आपल्या घरात असताना त्यांना अनोळखी नंबरवरून एक फोन आला. त्यात तो स्वतःला बिष्णोई गँगचा शार्पशूटर असल्याचे सांगत फोनवर बोलायला सुरुवात केली. तसेच त्याने आपले नाव रोहित गोदारा असे सांगितले असून आपण हा फोन ऑस्ट्रेलियातून करीत असल्याचे ही तो म्हणाला. शिवाय आपल्याच आदेशावरून सलमान खानच्या घरावर गोळीबार केला ◄◄ पान २ वर

# भाजपचा उमेदवार बिनविरोध विजयी

**सुरत । वृतसंस्था**

**गुजरातमधील सूरत येथील भाजप उमेदवार मुकेश दलाल हे बिनविरोध विजयी झाले आहेत. इतर सर्व उमेदवारांनी माघार घेतल्यामुळे दलाल यांचा विजय निश्चित झाला. पण, काँग्रेस उमेदवार निलेश कुंभानी यांनी उच्च न्यायालयात याप्रकरणी धाव घेतली, मात्र अद्याप कोणतीही अपडेट समोर आली नाही. अशा स्थितीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्याने मुकेश दलाल विजयी झाले आहेत.**

सोशल मीडियावर एक पोस्ट करत राहुल गांधी म्हटले की, हुकुमशहाचा खरा चेहरा पुन्हा एकदा देशासमोर आला आहे. आपला नेता निवडण्याचा जनतेचा अधिकार काढून घेणे हे बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान नष्ट करण्याच्या दिशेने टाकण्यात आलेले आणखी एक पाऊल आहे. मी पुन्हा एकदा सांगतो की, ही केवळ सरकार बनवणारी निवडणूक नाही तर देश वाचवण्याची निवडणूक आहे. संविधानाच्या रक्षणाची ही निवडणूक आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी आठही उमेदवारांनी आपले उमेदवार अर्ज मागे घेतले. त्यामुळे भाजपचे उमेदवार मुकेश दलाल यांची बिनविरोध निवड झाली. निवडणूक आयोगाकडून याची घोषणा केली जाईल. सूरत येथील काँग्रेसचे उमेदवार निलेश कुंभानी यांचा अर्ज रद्द झाल्याने समीकरणे बदलली होती. तर बसपाचे उमेदवार प्यारे लाल भारती यांनी अर्ज मागे घेतल्याने भाजपच्या विजयावर शिक्कामोर्तब झाला. दरम्यान, बिनविरोध निवड झालेले मुकेश दलाल हे गुजरात भाजपचे अध्यक्ष सीआर पाटील यांचे निकटवर्तीय आणि विश्वासू मानले जातात. सूरतच्या जागेवरून प्रथमच एखादा उमेदवार बिनविरोध निवडून आला आहे. इतर सर्व उमेदवारांनी माघार घेतल्यामुळे दलाल यांचा विजय निश्चित झाला. निवडणूक आयोगाकडून दलाल यांच्या विजयाची अधिकृत घोषणा केली जाईल. आता गुजरातच्या २५ जागांसाठी सात मे रोजी मतदान होणार आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२२ एप्रिल २०२३**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ५.५० क्विंटल | २,२०१ | २,२९० | २,२४५ |
| ज्वारी/हायब्रिड : ५९.०० क्विंटल | १,७०० | ७,७०१ | २,६६१ |
| मूग : ०.५० क्विंटल | ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : ८.५० क्विंटल | ८,७०० | १०,८०० | १०,०२७ |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ६,५०१ | ५,७५० |
| बाजरी: ३९.०० क्विंटल | २,४०० | २,७०० | २,५३५ |
| चिंचोका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४०० | २,४०० | २,४०० |
| सोयाबीन: २७३.०० क्विंटल | ४,५११ | ४,६२५ | ४,५८३ |
| हरभरा: ११.०० क्विंटल | ४,१०० | ५,६७२ | ५,१५१ |

# देशाच्या तिजोरीत १९.५८ लाख कोटी रूपये जमा

## प्रत्यक्ष करात १८ टक्क्यांची वाढ, डॉ.मनमोहन सिंह यांच्या काळात झाली सुधारणा

**पुणे । प्रतिनिधी**

**आर्थिक वर्ष २०२३–२४ नुकतेच संपले असून देशाच्या तिजोरीत प्रत्यक्ष कर संकलनात वार्षिक १७.७ टक्क्यांनी वाढ झाली आहे. यामुळे देशाच्या तिजोरीत १९.५८ लाख कोटी रूपये आले आहेत. जी गेल्या वर्षाच्या अंदाजास पेक्षा जास्त असल्याचे अर्थमंत्रालयाच्या कर विभागाने सांगितले. तसेच आर्थिक वर्ष २०२३–२४ मध्ये निव्वळ प्रत्यक्ष कर संकलनात झालेली वाढ ही गेल्या वर्षीच्या तुलनेपेक्षा ७.४० टक्क्यांपेक्षा अधिक असून १.३५ लाख कोटी अधिक आहे. विशेष म्हणजे अर्थमंत्रालयाच्या सुधारित अंदाजापेक्षा १३ हजार**





**कोटी रुपये प्रत्यक्ष कर जास्त राहिला आहे. प्रत्यक्ष कर संकलनात आयकर आणि कॉर्पोरेट कर संकलनाचा सर्वाधिक वाटा आहे. १९९१–९६ या कालावधीत घेण्यात आलेल्या निर्णयांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेची आणि देशाची दिशा बदलली असे म्हटले जाते. यामध्ये माजी पंतप्रधान तथा अर्थमंत्री मनमोहन सिंह यांचा मोठा वाटा आहे. डॉ.मनमोहन सिंह यांनी त्यावेळी घालून दिलेल्या आर्थिक वाटा आजही देशाच्या उपयोगी पडत आहेत.**

केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाच्या (सीबीडीटी) माहितीवरून मंत्रालयाने म्हटले आहे की, २०२३–२४ या आर्थिक वर्षात एकूण प्रत्यक्ष कर संकलन (तात्पुरती) १८.४८ टक्क्यांनी वाढून ती २३.३७ लाख कोटी रूपये झाले आहे. तर परताव्यानंतरचे निव्वळ उत्पन्न १७.७ टक्क्यांनी वाढून १९.५८ लाख कोटी रुपये झाले आहे. तसेच सीबीडीटीने सांगितले की, २०२३–२४ या आर्थिक वर्षात ३.७९ लाख कोटी रुपयांचा परतावा जारी करण्यात आला आहे. जो परताव्याच्या तुलनेत २२.७४ टक्के अधिक आहे. यामुळे प्रत्यक्ष कर संकलन (परतावा वगळता) बजेट अंदाजापेक्षा ७.४० टक्के जास्त असून तो सुधारित ◄◄ पान २ वर

# सोलापूरात वंचितच्या उमेदवाराकडून उमेदवारी मागे

## माझ्यामुळे भाजपाला मदत होण्याची भिती– राहूल गायकवाड

**सोलापूर । प्रतिनिधी**

**सोलापूर लोकसभा मतदारसंघात ऐनवेळी मोठा ट्विस्ट आला आहे. येथे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार राहुल गायकवाड यांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आजचा (२२ एप्रिल) शेवटचा दिवस आहे. वंचित बहुजन आघाडीचे ते अधिकृत उमेदवार आहेत. मात्र स्थानिक कार्यकारणी मदत करणार नाही हे लक्षात आल्याने त्यांनी या निवडणुकीतून माघार घेतली आहे. त्यांच्या या निर्णयामुळे आता सोलापुरातील निवडणुकीचे गणित बदलणार आहे.**

उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा निर्णय घेतल्यानंतर गायकवाड यांनी सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे. मला युद्धाच्या मैदानात उतरवण्यात आले, बंदुकही देण्यात आली. पण त्या बंदुकीत गोळ्याच नाहीत, अशी खदखद गायकवाड यांनी व्यक्त केली. माझी उमेदवारी जाहीर झाल्यापासून गेल्या पंधरा दिवसांपासून मी सोलापूर जिल्ह्यात आलो. इथे आल्यानंतर माझी सोलापूरच्या कार्यकारिणीशी भेट झाली. सोलापूरच्या जनतेलाही मी भेटलो. आंबेडकरी चळवळ माझ्या डीएनएमध्ये





आहे. मला पंधरा दिवसांत खूप काही अनुभवले आहे. या पंधरा दिवसांत मी जे अनुभवले ती चळवळ नाही. सोलापुरातील भोळीभाबडी जनता आंबेडकर या एका नावासाठी भावनिक आहे. जनतेला आंबेडकरांबद्दल आदर आहे. पण पंधरा दिवसांच्या कालावधीत मला समजले की, चळवळीसाठीची फळी पोकळ आहे. ही फळी पोषक नाही, अशा भावना राहुल गायकवाड यांनी व्यक्त केल्या. मी जर अर्धवट लढलो तर भाजपच्या कार्यकर्त्याला मदत करतोय, असे वाटतेय. भाजपच्या उमेदवाराला सोईचे वातावरण निर्माण होईल का, अशी मला भीती वाटत आहे. भाजपचा एक नेता माझ्यामुळे संसदेत जाईल. संविधानाला ◄◄ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# मतदारांची उदासीनता चिंता वाढविणारी

सत्ताधारी भाजपने एकीकडे 'चार सौ पार'चा नारा देत विकसित भारतासाठी पुन्हा मोदी सरकारचे आवाहन केले आहे तर दुसरीकडे सामान्यांना 'न्याय' देण्यासाठी विरोधकांच्या काँग्रेसप्रणीत 'इंडिया' आघाडीने मतदारांना सत्तापरिवर्तनाचे आवाहन केले आहे. दोन्ही बाजूंनी प्रचाराचा जोरदार धडाकाही उडवून देण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर शुक्रवारी लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी झालेल्या मतदानात मतदार उत्साहाने मतदानासाठी घराबाहेर पडतील अशी अपेक्षा होती. मात्र, प्रत्यक्षात मतदारांमध्ये फारसे उत्साहाचे वातावरण असल्याचे पहायला मिळाले नाहीच. त्यामुळे २०१९च्या मतदानाच्या तुलनेत यावेळी मतदानाचा टक्का घसरल्याचेच चित्र पहायला मिळाले.

हे चित्र सत्ताधाऱ्यांसोबतच विरोधकांनाही चिंतेत टाकणारेच आहे. महाराष्ट्रात रामटेक मतदारसंघासह उर्वरित चारही मतदारसंघांत मतदानाचा टक्का २०१९ च्या तुलनेत घसरल्याचेच पहायला मिळाले. नागपूर मतदारसंघात २०१९ ला ५४.७४ टक्के मतदान झाले होते. यावेळी ते ५३.९० टक्क्यांवर आले. जवळपास ४६ टक्के मतदारांनी मतदानाकडे चक्क पाठ फिरवली. चंद्रपूर मतदारसंघात २०१९ मध्ये ६४.८४ टक्के मतदान झाले होते. यावेळी ते २ टक्क्यांनी घटून ६२ टक्क्यांवर आले. गडचिरोली मतदारसंघात २०१९ मध्ये ७२ टक्के मतदान झाले होते. यावेळी ही टक्केवारी तब्बल ६ टक्क्यांनी घसरून ६६.२७ टक्क्यांवर आली. भंडारा-गोंदिया मतदारसंघात २०१९ मध्ये ६८.२७ टक्के मतदान झाले होते. यावेळी ते ६१.३७ टक्क्यांवर घसरले. रामटेक मतदारसंघातही २०१९च्या ६२.१२ टक्के मतदानाच्या तुलनेत यावेळी ५९.५८ टक्के अशी घसरण पहायला मिळाली. २१ राज्ये व केंद्रशासित प्रदेशातील १०२ जागांसाठी देशभरात झालेल्या मतदानाची सरासरी ६०.०३ टक्के एवढी राहिली. त्रिपुरामध्ये सर्वाधिक ७९.९० टक्के तर बिहारमध्ये सर्वांत कमी ४७.४९ टक्के मतदान झाले. यंदाच्या निवडणुकीत लोकसभेच्या जागांच्या संख्येनुसार सात टप्प्यांतील हा सर्वांत मोठा टप्पा होता. ९ केंद्रीय मंत्री, दोन माजी मुख्यमंत्री आणि एका माजी राज्यपालाचे भवितव्य या टप्प्यात मतदान यंत्रात बंद झाले आहे. अंदमान-निकोबारमध्ये ५६.८७, अरुणाचल प्रदेशात ६५.४६, आसाम ७१.३८, बिहार ४७.४९, छत्तीसगड ६३.४१, जम्मू-काश्मीर ६५.०८, लक्षद्वीप ५९.०२, मध्य प्रदेश ६३.३३, महाराष्ट्र ५५.२९, मणिपूर ६८.६२, मेघालय ७०.२६, मिझोराम ५४.१८, नागालँड ५६.७७, पुद्दुचेरी ७३.२५, राजस्थान ५०.९५, सिक्कीम ६८.०६, तामिळनाडू ६३.२०, त्रिपुरा ७९.९०, उत्तर प्रदेश ५७.६१, उत्तराखंड ५३.६४, पश्चिम बंगाल ७७.५७ टक्के मतदान झाले. मतदानाची ही टक्केवारी पाहता पहिल्या टप्प्यात तरी सत्ताधारी वा विरोधकांना मतदारांमध्ये आपापल्या बाजूने लाट वा उत्साह निर्माण करण्यात अपयशच आल्याचे दिसते.

मतदारांची मतदानातील ही उदासीनता सत्ताधारी व विरोधक या दोघांचीही चिंता वाढविणारी आहे. पहिल्या टप्प्यात तरी राजकीय पक्षांना मतदारांमध्ये नेहमीचे उत्साहाचे वातावरण तयार करण्यात अपयश आले, असाच याचा अर्थ निघतो. कदाचित पहिल्या टप्प्यासाठी ज्या भागात मतदान झाले तेथील राजकीय चित्र अगोदरच बऱ्यापैकी स्पष्ट असल्याचाही हा परिणाम असू शकतो. या टप्प्यात तामिळनाडूत सर्वच्या सर्व ३९ जागांसाठी मतदान झाले आहे. या राज्यात इंडिया आघाडीतील द्रमुक व काँग्रेस पक्षाचे निर्विवाद वर्चस्व आहे. मात्र, भारताच्या उर्वरित भागात होणारे जागांचे नुकसान भरून काढण्याच्या दृष्टीने भाजपने या राज्यात प्रचंड जोर लावला आहे. भाजपने अण्णाद्रमुकशी असणारी आघाडी तोडून यावेळी द्रमुक व अण्णाद्रमुक या दोघांशीही हातमिळवणी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यादृष्टीने भाजपने प्रदेशाध्यक्ष के. अन्नामलाई यांना 'फ्री हँड' दिला आहे. अन्नामलाई यांनीही दोन्ही प्रादेशिक पक्षांवर टीकेची झोड उठवत मोठी वातावरणनिर्मिती केली आहे. त्यामुळे भाजपला या निवडणुकीत आपला मतांचा टक्का वाढण्याची आशा आहे. तो वाढूही शकतो. मात्र, त्यामुळे किती जागांवर विजय मिळेल याबाबत साशंकताच आहे.

## मनोज जरांगे पाटील आज धारूर तालुक्यात विवीध गावाना भेटी देणार

किल्लेधारूर । प्रतिनिधी

**मराठा आरक्षणाचे संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील हे २३ एप्रील रोज धारूर तालूक्यात विवीध गावाना भेटी देऊन मराठा समाज बांधवाशी संपर्क साधणार आहेत**

मराठा आरक्षणाचे संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील हे २३ एप्रिल रोजी मंगळवारी धारुर तालूक्यात विवीध गावाना भेटी देणार असून मराठा बांधवाशी संपर्क साधणार आहेत धारूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून हा दौरा सुरू होणार असुन आवरगाव, पांगरी, कोळपिप्री, वाघोली येथे हरीनाम सप्ताहाला भेट,खोडस, आडस,आसरडोह,अंजनडोह, चोरंबा,चारदरी ये श्री हनूमान जयंती निमीत्त भेट असा हा दौरा असून मराठा आरक्षणा विषयी भुमिका पुढील अंदोलनाची दिशा या विषयी चर्चा करणार आहेत मराठा समाज बांधवानी मोठया संख्येने उपस्थीत राहण्याचे अवाहण सकल मराठा समाजाचे वतीने करण्यात आले आहे.

# मोदींच्या रूपाने देशात नवा पुतीन तयार होतोय का?

## शरद पवार यांनी व्यक्त केली चिंता

अमरावती । प्रतिनिधी

**रशियामध्ये ज्याप्रकारे व्लादिमीर पुतीन यांच्या हाती सत्ता सूत्रे एकवटली आहेत. त्याच प्रकारे मोदींच्या रूपाने देशामध्ये नवा पुतीन तयार होतोय का, अशी चिंता राष्ट्रवादीचे प्रमुख शरद पवार यांनी अमरावतीत सोमवारी (दि.२२) व्यक्त केली. काँग्रेस उमेदवार बळवंत वानखडे यांच्या प्रचारासाठी सांस्कृतिक भवन येथे आयोजित सभेदरम्यान ते बोलत होते. यावेळी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, काँग्रेस सरचिटणीस मुकुल वासनिक, माजी मंत्री अनिल देशमुख, आमदार यशोमती ठाकूर, डॉ. सुनील देशमुख आदी उपस्थित होते.**

ते म्हणाले की, या देशातील संसदीय लोकशाही संकटात जाईल, असे चित्र दिसते आहे. गेल्या दहा वर्षांपासून मी मोदींचा कारभार बघतो आहे. त्यांची भाषणे ऐकतो आहे. मी अनेकांसोबत काम केले आहे. राजीव गांधींपासून मनमोहन सिंगांपर्यंत. जवाहरलाल नेहरू नंतरच्या सर्व प्रधानमंत्र्यांची काम करण्याची पद्धत आम्ही पाहिली आहे. आतापर्यंतच्या प्रधानमंत्र्यांनी नवा भारत निर्माण करण्याचा संदेश दिला. मात्र, आजचे प्रधानमंत्री हे काँग्रेस आणि जवाहरलाल नेहरू यांच्यावर टीका करतात. त्यांच्याविषयी चुकीची माहिती पसरवितात. सत्ताधारी पक्षाच्या खासदारांमध्ये देखील मोदींची दहशत आहे. सत्ताधारी खासदार विरोधकांशी बोलत असताना तेथून मोदी गेले. तर खाली मान टाकतात. एवढी दहशत आहे. भाजप खासदारांच्या बैठकीत देखील इतरांना मत मांडण्याचा अधिकार नसतो. मोदी येतात बोलतात आणि जातात. ही स्थिती पाहिल्यास मोदींच्या रूपाने रशियाप्रमाणे नवा पुतीन तयार होतोय का, ही चिंता देशातील जनतेला आहे, असे पवार म्हणाले. भाजपचे खासदार मोदींचे हात बळकट करण्यासाठी राज्यघटना बदलण्याची भाषा उघडपणे करत आहेत. राज्यघटना बदलली पाहिजे, अशी इच्छा बाळगणाऱ्यांच्या हाती सत्ता गेल्यास देशाची संसदीय लोकशाही संकटात येईल, अशी भीती शरद पवार यांनी व्यक्त केली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठिंबावर खासदार झालेल्या आणि यावेळेस भाजपच्या अमरावती लोकसभेत उमेदवार असलेल्या नवनीत राणा यांच्यावर देखील शरद पवार यांनी टीका केली. पवार म्हणाले, मी येथे आलो आहे, ते अमरावतीकरांची माफी मागण्यासाठी. मागच्या वेळेस माझ्याकडून एक चूक झाली. पाच वर्षांपूर्वी झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत त्यावेळच्या उमेदवाराला (नवनीत राणा) मतदान करा, हे सांगण्यासाठी मी जाहीर सभा घेतल्या. लोकांनी माझा संदेश स्वीकारला. आम्ही त्यांना पाठिंबा दिला. त्यांना खासदार केले.

# ११ टन सोने, १८ हजार कोटी रोख अन् बरेच काही!

## गर्भश्रीमंत तिरुपतीच्या बालाजी मंदिराची संपती नेमकी किती?

तिरुपती । वृतसंस्था

**जगातील सर्वात श्रीमंत मंदिर ट्रस्ट असलेल्या तिरुमला तिरुपती देवस्थानमने गेल्या १२ वर्षात ट्रस्टने केलेल्या मुदत ठेवींच्या तुलनेत यावर्षी सर्वाधिक ११६१ कोटी रुपये जमा केले आहेत. म्हणजेच तिरुमाला तिरुपती देवस्थानम जे भगवान व्यंकटेश्वर स्वामी मंदिराचे व्यवस्थापन करते. जिथे भक्तांनी केलेला दान स्वरुपातील बाबींची जबाबदारी ट्रस्ट पाहते. या मंदिरात दरवर्षी जगभरातून लाखो भाविक येतात.**



टाइम्स ऑफ इंडियाच्या अहवालानुसार, तिरुमला तिरुपती देवस्थानम हे देशातील एकमेव हिंदू धार्मिक ट्रस्ट आहे जे गेल्या १२ वर्षांत वर्षानुवर्षे ५०० कोटी रुपये किंवा त्याहून अधिक रक्कम जमा करून वेगाने वाढत आहे. याआधी, केवळ तीन प्रकरणांमध्ये या मंदिराचा प्रसाद ५०० कोटी रुपयांपेक्षा कमी होता. २०१२ पर्यंत, च्या मुदत ठेवी ४८२० कोटी रुपये होत्या. त्याच वेळी, तिरुपती ट्रस्टने २०१३ ते २०२४ दरम्यान ८४६७ कोटी रुपये जमा केले होते, जे देशातील कोणत्याही मंदिर ट्रस्टसाठी कदाचित सर्वाधिक आहे. २०१३ पासून तिरुमला तिरुपती देवस्थानमच्या वार्षिक मुदत ठेवी पुढीलप्रमाणे आहेत. २०१३ मध्ये ६०८ कोटी रुपये, २०१४ मध्ये ९७० कोटी रुपये, २०१५ मध्ये ९६१ कोटी रुपये, २०१६ मध्ये ११५३ कोटी रुपये, २०१६ मध्ये ७७४ कोटी रुपये, २०१७ मध्ये रुपये आहेत. २०१८ मध्ये ५०१ कोटी, २०१९ मध्ये २८५ कोटी रुपये, २०२० मध्ये ७५३ कोटी रुपये, २०२१ मध्ये २७० कोटी रुपये, २०२२ मध्ये २७४ कोटी रुपये, २०२३ मध्ये ७५७ कोटी रुपये आणि २०२४ मध्ये ११६१ कोटी रुपये झाले आहेत. तिरुपती ट्रस्टची मुदत ठेवीची रक्कम ५०० कोटी रुपयांच्या खाली घसरण्याची ही पहिलीच वेळ होती. २०२१ आणि २०२२ मध्ये कोरोना महामारीच्या काळात ते देखील कमी झाले होते. याआधी २०१९ मध्येही ही रक्कम कमी झाली होती. तथापि, यावर्षी ११६१ कोटी रुपयांची करून, तिरुमला तिरुपती देवस्थानम ट्रस्टने २०१७ मध्ये केलेल्या ११५३ कोटी रुपयांच्या सर्वाधिक मुदत ठेवींना मागे टाकले आहे.

### ट्रस्टला एका वर्षात व्याजावर इतके पैसे मिळतात

नुसार, बँकांमध्ये जमा केलेली एकूण एफडी १३ हजार २८७ कोटींवर पोहोचली आहे, श्री व्यंकटेश्वर नित्य अन्नप्रसादम ट्रस्ट, श्री वेंकटेश्वर प्रंदनम ट्रस्ट इत्यादींसह मंदिर ट्रस्टद्वारे चालवल्या जाणाऱ्या अनेक ट्रस्टना भक्तांकडून भरीव देणग्या मिळत आहेत. त्यांच्याकडे जवळपास ५५२९ कोटी रुपयांची मुदत ठेव आहे. एकूणच, एप्रिल २०२४ पर्यंत, तिरुपती ट्रस्टची बँका आणि त्याच्या विविध ट्रस्टमधील रोकड १८ हजार ८१७ कोटींवर पोहोचली आहे, जी च्या इतिहासातील सर्वाधिक आहे. वार्षिक, तिरुपती ट्रस्टला त्याच्या वर व्याज म्हणून १६०० कोटी रुपयांची मोठी रक्कम मिळते. दुसरीकडे, तिरुपती ट्रस्टने नुकतेच १०३१ किलो सोने जमा केल्यानंतर आता तिरुमला तिरुपती देवस्थानम ट्रस्टचे ११३२९ किलो सोनेही बँकांमध्ये जमा झाले आहे.

## हनुमान जयंतीनिमित्त महाप्रसादाचा लाभ भक्तांनी घ्यावा-डॉ.सुरेश साबळे

माजलगाव। प्रतिनिधी

**रामभक्त हनुमान यांच्या जयंतीच्या निमित्ताने माजलगाव येथील दक्षिणमुखी मारोती मंदिरामध्ये हनुमानाचा जन्मोत्सव साजरा करण्यात येणार असून या महोत्सवाकरता सकाळी ७ ते ८ या वेळी शिवमुद्रा डान्स तसेच सायंकाळी ४ वाजता सुंदरकांडचे आयोजन केले असून या सर्व कार्यक्रमास माजलगाव येथील रामभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थितीत राहण्याचे आवाहन डॉ.सुरेश साबळे यांनी केले आहे.**



माजलगाव येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असून या महोत्सवाच्या निमित्ताने सांस्कृतीक, धार्मीक, अध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन हे केले असून यासाठी जगदिश चांडक, हेमंत कदम, भारत होके, नंदकिशोर मुंदडा, बंडू इके, श्री.गोंडे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांच्या सहभागातून हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. पहाटे ५ वाजता माजी आ.राधाकृष्ण होकेपाटील व डॉ.सुरेश साबळे यांच्या हस्ते विधीवत अभिषेक संपन्न होणार असून त्यानंतर हनुमान जन्मोत्सव संपन्न होईल. या कार्यक्रमानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून या महाप्रसादाचा लाभ सर्व रामभक्तांनी घ्यावा असे कळविण्यात आले आहे.

## पान १वरून...

### शेतकऱ्यांचे आश्रू पुसण्याची

उद्योग गुजरातला गेल्याचेचे ऐकण्यात येत असल्याचे ठाकरे म्हणाले. राज्यातील शेतकरी अडचणीत असताना त्याला त्यातून बाहेर काढले जात नाही. पण मी मुख्यमंत्री असताना नागपूरच्या अधिवेशनात २ लाखांपर्यंतचे पीक कर्ज माफ करण्याची घोषणा मी केली होती. तर माझ्या निर्णयाने फक्त अंगठ्यावरती नुकसान भरपाई मिळाली होती. मात्र हे फक्त अंगठे दाखवत आहेत. मिळत काही नाही. आम्हाला भारत सरकार हवे, मोदी सरकार नको, असे देखील उद्धव ठाकरे यांनी म्हटले. तसेच केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्प मांडताना, शेतकरी, महिला, गरीब आणि युवा या चार जाती मांडल्या होत्या. पण आता यापैकी एका देखील जातीला भाजपने समाधानी केल्याचे दाखवा. शेतकरी, महिला, गरीब आणि युवा यामध्ये कोणीच समाधानी नाही. यानंतर सीतारमण म्हणाल्या पैसे नाहीत म्हणून निवडणूक लढाणार नाही. पण आम्ही निवडणूक रोखे परत आणू. तर देशाला खरे कोणी लूटले हे पाहायचे असेल तर भाजप आणि काँग्रेसच्या खात्यातले पैसे काढा म्हणजे सत्य समोर येईल. भाजपने अडीच वर्षात देशाला लुटले. मोदी की गॅरेंटी म्हणजे भ्रष्टाचार करा आणि भाजपमध्ये प्रवेश करा. यामुळे मोदी गॅरेंटी हवी की ठाकरेंचे वचन हे तुम्ही निवडा असे ठाकरे यांनी म्हटले.

-------------

### राज्यात महाविकास आघाडी

पाटील, खा. रजनीताई पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्हाधिकारी कार्यालयात सादर केला. त्यानंतर राष्ट्रवादी भवन या पक्ष कार्यालयात कार्यकर्त्यांची संवाद साधताना जयंत पाटील म्हणाले की, राज्यात महाविकास आघाडीच्या ३२ ते ३५ जागा निवडून येणार आहेत. देशांमध्ये महाविकास आघाडीच्या प्रचंड मोठ्या सभा होत आहेत. लोकांचे मत आता महाविकासकडे वळत आहे. आमच्याकडे नेते जास्त नाहीत. पण जनता मात्र प्रचंड प्रमाणात आहे. याची दक्षता घेण्याचा सल्ला देखील त्यांनी कार्यकर्त्यांना दिला. तर बजरंग बप्पा सोनवणे हे बीड लोकसभेला निवडून येणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. सलग पंधरा वर्षे भाजपची सत्ता असताना जे जिल्ह्याचा विकास करू शकले नाहीत, त्यांची अकृतीशीलता असून भाजप जिल्ह्यातील जनतेने दिलेल्या जबाबदारी पेलू शकले नसल्याचा आरोप त्यांनी केला. देशात संविधान वाचवायचे असेल आणि शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचार आणि संविधान वाचविण्यासाठी या देशात भाजप विरोधी लाट निर्माण झाली आहे. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तर जीएसटीने शेतकरी, शेतमजूर आणि सामान्य जनता हैराण झाली आहे. आत्ता पर्यंत देशात काँग्रेस आणि समविचारी पक्षाने केलेला विकास याला शून्य ठरविण्याचे कटकारस्थान मोदी करीत असल्याचा आरोप त्यांनी भाजपवर केला. तसेच जिल्हा सुजलाम सुफलाम करण्याचे अभिवचन देखील त्यांनी यावेळी दिले. भाजपच्या नेत्यांनी टीकाटिपणी करण्यापेक्षा विकासाच्या मुद्द्यावर बोलावे, असा देखील सल्ला त्यांनी भाजपला दिला. यावेळी बजरंग बप्पा सोनवणे म्हणाले की, आता नेते नव्हे तर जनता आमच्या सोबत असून भाजप सरकार हे सत्तेच्या पाचपट सत्तेचा गैरवापर करीत आहे. निवडणुक ही गैरविश्वासाच्या मुद्द्यावर लढविली जात असून मी मॅनेज असल्याचा माझ्यावर आरोप होतोय. परंतु मी मरते दम तक शरदचंद्र पवार साहेब यांच्या विचाराचा पाईक असून मी मॅनेज होणार नाही. असा त्यांनी कार्यकर्त्यांना विश्वास दिला. त्याचबरोबर पालकमंत्र्याच्या विधानाचा समाचार घेताना ते म्हणाले की, मी जरूर माझी छाती फाडून धनंजय मुंडे आणि अजित दादा हे छातीत असल्याचे म्हणालो, परंतु आणखी चार महिन्या नंतर निवडणूक संपल्या नंतर ते दोघेही शरदचंद्र पवार यांच्या पक्षात येतील. परंतु त्यांना पक्षात घ्यायचे किंवा नाही हे आम्ही ठरवू. तसेच अहमदनगर ते परळी रेल्वे मार्गा विषयी बोलताना त्यांनी सांगितले की, हा रेल्वे मार्ग २५६ किलोमीटर पासून १५ वर्षां मध्ये केवळ ९९ किलोमीटरचे काम पूर्ण झालेले आहे. हा रेल्वे मार्ग पूर्ण होण्यासाठी आणखी २५ वर्षे लागतील. म्हणजे किमान दोन पिढ्या तरी हा रेल्वे मार्ग पूर्ण होणार नाही. परंतु मी निवडून आल्यानंतर अवघ्या दोन वर्षांमध्ये ही काम पूर्णत्वाकडे घेऊन जाईन. त्याच बरोबर राष्ट्रीय महामार्गाची कामे १० वर्षांत तरी पूर्ण होऊ शकलेले नाही. या रस्त्याच्या अर्धवट कामामुळे २ हजार लोकांची जीव जाऊन अनेकजण जखमी व जायबंदी झालेले आहेत. पंकजाताई म्हणायच्या की, पुढच्या लोकसभेची निवडणूकीचा अर्ज भरताना मी रेल्वेने फॉर्म भरायला येईन. त्या खरेच रेल्वेने उमेदवारी अर्ज दाखल करायला येणार का? असाही प्रश्न त्यांनी पंकजाताई मुंडे यांचे नाव न घेता केला आणि ज्या पंकजाताई म्हणत होते की मी प्रीतमताई चे ताट ओढून घेणार नाही. मग त्यांनी सख्ख्या बहिणीचे ताट का ओढून घेतले? यासाठी त्यांच्यावर कोणाचा दबाव होता? याचे उत्तर त्यांनी देण्याची मागणी केली. पालकमंत्र्याविषयी बोलताना म्हणाले की, पालकमंत्री जरा सबुरीने घ्या. आमची औकात काढू नका. स्व.गोपीनाथ मुंडे साहेबांनी राज्यातील २६ साखर कारखाने चालवले आणि तीन स्वतः काढले. ते कारखाने बंद करण्याचे पाप या मुंडे कुटुंबीयांनी केले असून, मी एक सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातून आहे. तरी मी दोन कारखाने यशस्वीपणे चालवीत असून, मराठवाड्यात सर्वाधिक भाव देत आहेत. तसेच जिल्ह्यातील जनतेचा प्रारब्ध ठरविणारा कोणी माईचा लाल जन्माला आलेला नाही. मग तुम्ही प्रारब्ध ठरविणारे कोण? असाही जळजळीत सवाल त्यांनी केला. तसेच टीका करायची असेल तर होऊन जाऊ द्या. घोडा मैदान जवळ आहे. तसेच मी कशाची शेती करतो? त्याचा तपास करू असे म्हणणाऱ्या पालकमंत्र्यांना जवाब देत बजरंग बप्पा म्हणाले की, माझ्या शेतात काय पिकतं? आता पर्यंत तुम्ही कसं बघितलं नाही. दुर्बीण लावून बघा. आम्ही पण बघतो. तुम्ही बहिण - भाऊ एक झालात पण कार्यकर्त्यांनी काय करायचं? तसेच मतदारसंघात मी उसाचे राजकारण कधी करणार नाही. असाही शेतकऱ्यांना विश्वास त्यांनी यावेळी दिला. यावेळी खा. रजनीताई पाटील, महेबुब शेख, दीपक भाई केदार, कॉ. नामदेवराव चव्हाण, गणेश वरेकर, फुलचंद कराड, ॲड. हेमा पिंपळे, माजी आमदार बदामराव पंडित यांचीही भाषणे झाली.

-----------

### आ.आव्हाड यांना बिष्णोई

असल्याचे सांगून त्याने खंडणीची मागणी केली. जर, ही खंडणी न दिल्यास तुमचे बरेवाईट होईल, त्यासाठी कफन खरेदी करून ठेवा, असे तो म्हणाला. दरम्यान, रोहित गोदरा याच्यासंदर्भात माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता, तो राष्ट्रीय करणी सेनेचे अध्यक्ष सुखदेवसिंह गोगामडी याच्या खून प्रकरणातील आरोपी असल्याची माहिती आव्हाड यांनी दिली.

------------

### स्वाराती रुग्णालयाच्या अपघात

वारंवार घडतांना दिसून येत आहेत. यावरून शहराची सांस्कृतिक व शांतता प्रिय अशी ओळख पुसल्या जात आहे की काय असे चित्र निर्माण होऊ पहात असल्याची चर्चा सर्वसामान्य नागरिकांतुन केल्या जात आहे. प्राप्त माहितीनुसार शहरात उन्हाळ्याच्या सुट्टीमुळे बच्चेकंपनी साठी आनंद नागरीचे आगमन झाले आहे. सुट्ट्यांमुळे आनंद नगरीस चांगला प्रतिसाद मिळतो आहे. मात्र येथे येणाऱ्या हुल्लडबाज व टवाळखोर गुंडाच्या मुळे आनंदात विर्जन पडतांना दिसत आहे. असाच प्रकार रविवारी रात्री शहरातील मंगळवार पेठेत सुरू असलेल्या आनंद नगरीत सदर बाजार आणि बाराभाई गल्लीतील तरुणात वाद झाला. यावेळी एका तरुणाला मारहाण करण्यात आली. त्यानंतर जखमी तरुण स्वाराती रुग्णालयात उपचारासाठी गेला असता त्या ठिकाणी या दोन्ही भागातील तरुणांमध्ये पुन्हा मोठा वाद सुरू झाला. या वादाचे पर्यावसन तुफान हाणामारीत झाले. या तरुणांना अपघात विभाग सारख्या संवेदनशील ठिकाणी गोंधळ घालू नये याचेही भान राहिले नाही. चक्क अपघात विभागात घुसून एकमेकांवर खुर्च्या फेकत त्यांनी प्रचंड गोंधळ घातला. यावेळी रुग्ण, डॉक्टर आणि कर्मचारी जीव मुठीत धरून एका बाजूला जाऊन बसले. किमान पाऊणतास हा धुडगूस सुरू होता. अखेर रुग्णालयाच्या सुरक्षा रक्षकांनी हस्तक्षेप करत जमाव शांत केला. या घटनेमुळे स्वाराती रुग्णालयाच्या सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गावगुंडांनी स्वा रा ती च्या अपघात विभागात इतर रुग्णांच्या समोर केलेला राडा पुनः होऊ नये याकडे अंबाजोगाई पोलीस प्रशासन व स्वाराती च्या सुरक्षा कडून काळजी घेण्यात यावी अशी अपेक्षा येथील रुग्ण, नातेवाईक आणि शहरातील नागरिकांकडून केल्या जात आहे.

-----------

### सोलापूरात वंचितच्या

धोका निर्माण होईल, असे माझ्याकडून काही होऊ नये असे मला वाटते, असे थेट स्पष्टीकरण राहुल गायकवाड यांनी दिले. दरम्यान, गायकवाड यांच्या या निर्णयामुळे सोलापूर मतदारसंघाच्या निवडणुकीचे गणित बदलणार आहे. २०१९ सालच्या निवडणुकीत या जागेवर वंचितच्या तिकिटावर प्रकाश आबंबेडकर यांनी निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत आंबेडकरांना एक लाख ७० हजार मते मिळाली होती. याचा फटका सुशीलकुमार शिंदे यांना बसला होता. त्यांचा या निवडणुकीत पराभव झाला होता. यावेळीदेखील वंचितने येथून राहुल गायकवाड यांना तिकीट दिले होते. त्यामुळे त्याचा फटका काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांना बसण्याची शक्यता होती. मात्र आता गायकवाड यांनी माघार घेतल्यामुळे प्रणिती शिंदे यांना त्याचा फायदा होणार आहे.

--------------

### देशाच्या तिजोरीत १९.५८

अंदाजापेक्षा ०.६७ टक्के जास्त आहे. या कालावधीत, परताव्याच्या समायोजनापूर्वी प्रत्यक्ष करांचे एकूण संकलन २३.३७ लाख कोटी होते. जी आर्थिक वर्ष २०२३-२४ मधील १९.७२ लाख कोटी रुपयांच्या एकूण संकलनापेक्षा १८.४८ टक्के अधिक आहे. तर मागील आर्थिक वर्षात सकल कॉर्पोरेट कर संकलन (तात्पुरते) १० लाख कोटी रुपयांच्या तुलनेत १३.०६ टक्क्यांनी वाढून ११.३२ लाख कोटी रुपये झाल्याचे मंत्रालयाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. सीबीडीटीनुसार, आर्थिक वर्ष २३-२४ मध्ये निव्वळ कॉर्पोरेट कर संकलन (तात्पुरते) ९.११ लाख कोटी रुपये होते. जे मागील आर्थिक वर्षील ८.२६ लाख कोटी रुपयांपेक्षा १०.२६ टक्के जास्त आहे. या कालावधीत सिक्युरिटीज ट्रान्झॅक्शन टॅक्स (तात्पुरती) सह एकूण वैयक्तिक आयकर संकलन १२.०१ लाख कोटी रुपये होते. जे गेल्या आर्थिक वर्षातील ९.६७ लाख कोटींच्या संकलनापेक्षा २४.२६ टक्के अधिक आहे. सिक्युरिटीज ट्रान्झॅक्शन टॅक्ससह निव्वळ वैयक्तिक आयकर संकलन १०.४४ लाख कोटी रुपये होते. मागील आर्थिक वर्षातील ८.३३ लाख कोटी रुपयांच्या संकलनापेक्षा हे २५.२३ टक्के अधिक आहे.

--------------

### विदर्भ, मराठवाड्यात

गारपीट आणि पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला होता. दक्षिण छत्तीसगडपासून दक्षिण तामिळनाडूपर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा सक्रिय आहे. राज्यात पावसाला पोषक हवामान असून, विदर्भातील अमरावती, नागपूर, वर्धा, यवतमाळ जिल्ह्यांत वादळी पावसासह गारपीट होण्याचा इशारा आहे. याशिवाय विदर्भातील इतर जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाजही हवामान विभागाने दिला. तसेच मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि खानेदशातही काही ठिकाणी हलक्या सरी पडतील, असा अंदाज हवामान विभागाने दिला. दुसरीकडे राज्यात उन्हाचा चटकाही कायम राहण्याचा अंदाज आहे. सिंधुदूर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे आणि मुंबई जिल्ह्यात काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

-------------------

cmyk

## आचार्य श्री महाश्रमणजी म. सा. यांची अहिंसा पदयात्रा आज पाटोद्यात

**पाटोदा । प्रतिनिधी**

धर्मपारायण जैन श्वोतांबर तेरापंथ धर्मसंघाचे अकरावे आचार्य महान तपस्वी युगपुरुष श्री महाश्रमणजी म.सा. यांच्या अहिंसा पदयात्रेचे आज साकत येथून पाटोदा नगरीत आगमन होणार त्यांच्या समवेत जवळपास शंभर साधू साध्वी सोबत असणार आहेत.



आचार्य महाश्रमण

याबाबत अधिक माहिती अशी की युगपुरुष महाश्रमणजी म.सा. यांची ही भव्य दिव्य अहिंसा पदयात्रा समाजात सदभावना , नैतिकता ,व नशामुक्ती व धार्मिक जनजागृती यासाठी काम करत आहे. अहिंसेच्या मार्गावर सर्वांनी चालत राहावे यासाठी नेपाळ, भुटान व आपला भारत देश अशी तब्बल ३ देशात व २३ राज्यात भ्रमण करून जवळपास ६०००० किलो मिटर ची ही पायी पदयात्रा आहे आता पुढे महाराष्ट्रातून सुरत गुजरात कडे जाणार आहे .या पदयात्रेत तब्बल १०० साधू साध्वी व व जवळपास ३०० स्वयंसेवक असून आज मंगळवार पाटोदा नगरीत ही यात्रा मुक्कामी येत असून मंगळवारी सकाळी ९ ते १० शहरातील जैन स्थानक येथून ही पदयात्रा बजारतळ, राजं महमद चौक ,छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे जयभवानी महाविद्यालय येथे थांबणार असून सकाळी १० ते ११ सर्वासाठी खुले व्याख्यान होणार आहे, दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम हे जयभवानी महाविद्यालय चूंबळी फाटा रोड येथे होणार असून सायंकाळी ८ वाजता दर्शन सोहळा होणार आहे. व नंतर धार्मिक चर्चा होणार असून बुधवारी सकाळी ही पदयात्रा थेरला कडे रवाना होईल तरी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने शहवासीयांनी उपस्थित राहावे असे आवाहन जैन श्रावण संघ पाटोदा यांनी केले आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार, दि. २३ एप्रिल २०२४


# आजपासून श्रीक्षेत्र पद्मावती देवीचा दोन दिवस चालणार यात्रा महोत्सव

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राज्यातील महत्वाच्या साडेतीन पिठातील एक उपपिट म्हणून असलेल्या जागृत देवस्थान तालुक्यातील पुस येथे श्रीक्षेत्र पद्मावती देवीचे भव्य दिव्य मंदिर असून या मंदिरात वर्षातून दोन वेळा मोठे उत्सव साजरे केले जातात. त्यापेकी चैत्र पोर्णिमेच्या दिवशी पद्मावती देवीचा दोन दिवसीय यात्रा महोत्सव असतो. या महोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमाची रेलचेल राहणार आहे.

अंबाजोगाई ते अहमदपुर या रस्त्यावर शहरापासून दहा किलो मीटर अंतरावर असलेले पुस येथील हेमाडपंती असलेले आणि नव्यानेच जीर्नोद्वार असलेले श्रीक्षेत्र पद्मावती देवीचे मेंदिर साडेतीन पिठातील एक उपपिठ मानले जाते. या मंदिर परिसरात चैत्र पौर्णिमेच्या मुहूर्तावर मंगळवार-बुधवार या दोन दिवसात या महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होतो. या महोत्सवात देवीची महापुजा- महाअभिशेक, पालखी मिरवणूक तर बुधवारी महापुजा, महाभिषेक आराधी गीतांनी परिसर दुमदुमून जातो. सायंकाळच्या सुमारास कुस्ती स्पर्धा घेण्यात येते. या स्पर्धेतील स्पर्धेत मराठवाड्यातील मल्ल सहभागी होतात. दाट झाली,




### विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल

उंच डोंगराच्या पायथ्याची असलेल्या दंड कारण्यात पद्मावती देवीने तपश्चार्यासाठी हे ठिकाण निवडले होते. याच परिसरात महर्षी पुत्र सुकाचार्यांनी तप केल्यामुळे या ठिकाणाला विशेष महत्व आहे. सुकचार्यांचे मंदिर देशात दुर्मिळ ठिकाणी आढळत असले तरी महाराष्ट्रात हेच एकमेव ठिकाण आहे. चैत्र पोर्णिमेच्या दिवशी अंबाजोगाई तालुक्यातील मांडवा, ऋषी (पठाण मांडवा) याज्ञवलक्य ऋषी (देवळा) भाद्वाज ऋषी, (भारज) गार्गऋषी (गिरवली), वाल्मिक ऋषी (वाला) आदी ठिकाणी ऋषींनी तपश्चर्या केल्यामुळे वरील ठिकाणी भाविकांसाठी महत्वपुर्ण मानले जाते. पद्मावती देवीच्या पुर्वस कृष्ण पर्वतावर प्रत्येक्ष दत्त मुनींनी पदूस्पर्श केल्यामुळे ही पुसची भूमि पावन झालेला परिसर मानला जातो. पद्मावतीच्या वास्तव्याने हा परिसरत पुणीत झाला आहे. अंबाजोगाई येथील ग्रामदेवता योगेश्वरी देवी आणि परळी येथील प्रभु वैद्यनाथाप्रमाणेच पुसच्या पद्मावती देवीचे स्थान पावन झाले असल्याचे आख्यायीका सांगण्यात येते. श्रीक्षेत्र पद्मावती देवी मंदिरात तुळला भवाची मुर्ती असून उत्तरेस यज्ञ कुंड, पश्चिमेस जलकुंड, पुर्वेस व पश्चिमेस दोन तलाव तुडूंब भरलेले असल्यामुळे रखरखत्या उन्हातही या परिसरात आलेला भाविक प्रसन्न होतो.

**यात्रा महोत्सवाचा लाभ घ्यावा**

श्रीक्षेत्र पद्मावती देवीच्या मंदिरात दोन मोठे उत्सव साजरे होतात. त्यात नवरात्रीच्या नऊ दिवस व चैत्र पोर्णिमेला दोन दिवसीय यात्रा महोत्सव साजरा केला जातो. या महोत्सवाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन सरपंच सौ.ज्ञानेश्वरी लक्ष्मीकांत पवार व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# खडकत येथून आठ टन गोवंशीय मांस बाहेरगावी जाताना जप्त

## पोलीसांची कडक कारवाई

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यात खडकत शिवारात कत्तलखाने उद्ध्वस्त करून महिना उलटत नाही,तोच गोवंशीय जनावरांची कत्तल सुरूच असल्याचे पुढे आले आहे.खडकत येथे कत्तल करून सुमारे आठ टन गोमांस शेजारील मिरजगाव (ता. कर्जत) परिसरातील निंबोडी शिवारात मोठ्या वाहनात पॅकिंग करून बाहेरगावी पाठविले जात असताना मिरजगाव पोलिसांनी हे मांस जप्त केले आहे.या प्रकरणी ९ जणांवर मिरजगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

मिरजगावचे पोलिस हवालदार राजेंद्र गाडे यांनी फिर्याद दिली. या फिर्यादीवरून इम्रान शेख (वय ३२ बीड), जगीर पठाण (वय ५४), मुसवीर कुरेशी (३१),अल्केश कुरेशी (१९, सर्व रा. खडकत, ता.आष्टी), वाहनचालक योगेश परदेशी (४५ रा. खडकपुरा गावी,ता. करमाळा) यांच्यासह ९ जणांवर गुन्हा दाखल झाला.या कारवाईत पोलिसांनी लहान-मोठ्या ४६ गोवंशीय जनावरांची सुटका केली.निंबोडी शिवार (ता.कर्जत) येथे गोवंशीय जनावरांची कत्तल करून मांस वाहनात भरत असुन काही जनावरे कत्तलीसाठी आणली आहेत.याची माहिती पोलिसांनी मिळाली होती.यावरून पोलिसांनी याठिकाणी छापा मारला असता,आयशर टेंपोमध्ये (एमएम०४ एफयू ६२२०) गोमांस मिळून आले. यावेळी दोन जण वाहन सोडून पळून गेले. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले.हे खडकत येथे जनावरांची कत्तल करून त्यांचे मांस छोट्या वाहनाने येथे आणून मोठ्या टेंपोत भरून ते बाहेरगावी नेत असल्याचे संशयितांनी सांगितले.

पोलिसांनी या कारवाईत आठ टन गोमांस,दोन टेंपो,पाच दुचाकी व एका कारसह ४५ गोवंशीय जनावरे असा २१ लाख ५१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.एका टेंपोत ३८ लहान वासरे मिळून आली.या ठिकाणापासून काही अंतरावर झाडांमध्ये गोवंश जातीच्या व कत्तलीसाठी आणलेल्या आठ जनावरांची सुटका करण्यात आली आहे.

# मराठा समाजासोबत मुस्लीम समाजाच्या १०% आरक्षणासाठी मनोज जरागे पाटील यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

बीड येथील पत्रकार व तथा संपादक सलामत पठाण यांच्या निवासस्थानी मनोज जरांगे पाटील यांनी सदिच्छा भेट दिली. तसेच मुस्लिम समाजा संदर्भात अनेक विषयावर चर्चा करुन त्यांना निवेदन देण्यात आले . निवेदनात म्हटले आहे की

मराठा योद्धा जरांगे पाटील यांनी मराठा समाजासाठी आरक्षण मिळावे. या यासाठी लढा उभा केला तसेच मुस्लिम समाजासाठी सुद्धा दहा टक्के आरक्षण मिळावे व मराठा समाजासाठी लढा लढणारे मनोज जरांगे पाटील मराठा समाजाच्या न्याय हक्काच्या आरक्षणासाठी आपण आंदोलनाच्या संघर्षातुन यशस्वी वाटचालीतुन क्रांती घडवीली. तसेच महाराष्ट्रात



मुस्लीम समाज मोठ्या प्रमाणात गरीबीने पिछाडलेला आहे. समाजातील अर्थिक पिछाडलेल्या वर्गासाठी सर्वोत्तम सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याच्या दृष्टीकोणातून मुस्लीम सामाजासाठी १०% आरक्षण प्रस्तावित केले गेले आहे.

या संदर्भात आपणासारख्या दणकट, निस्वार्थ क्रांतीकारी नेतृत्वाची गरज आहे. मनोज दादा पाटलांनी मुस्लीम समाजाच्या आरक्षणासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी करण्यात आली.या वेळी सामाजिक चळवळ सदस्य सलामत पठाण (पत्रकार), संपादक गंगाधर काळकुटे,शाहेद सय्यद ,नूर खान पठाण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भगवान महावीर जयंतीनिमित्त अंबाजोगाईत निघाली भव्य शोभायात्रा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

२४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांचा २५५० वा जन्मकल्याणक महोत्सव अंबाजोगाईत साजरा करण्यात आला.या निमित्ताने अंबाजोगाई शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. अंबाजोगाईत सकल जैन समाजाच्या वतीने भगवान महावीर जन्म कल्याण महोत्सव धार्मिक वातावरणात पार पडला. सकाळी शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यामध्ये विशेष आकर्षण म्हणजे युवती व महिलांचे ढोल पथक. अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने हे ढोल पथक सादरीकरण करत होते.

या मिरवणुकीत सकल जैन समाजातील सर्व श्रावक ,श्राविका सहभागी झाले होते.युवक व युवती गटाने उत्साहाने या शोभायात्रेचे नियोजन केले होते.यावेळी



भगवान महावीरांच्या जीवनावरील नाटिका जैनस्थानकमध्ये साजरी सादर करण्यात आली.जन्मकल्याणक महोत्सव अत्यंत कलात्मक पद्धतीने नृत्यातून दाखवण्यात आला.याशिवाय अभिषेक, पूजन व भजन ,महावीरजन्म या कार्यक्रमांमध्ये सर्व सकल जैन धर्मियांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला होता. भव्य अशा या शोभायात्रेचे स्वागत विविध पक्ष व संघटनांच्या प्रमुख व पदाधिकारी यांनी भगवान महावीरांना अभिवादन करून केले.या शोभायात्रेत पदमकुमार लिंबाळकर , गौतमचंद सोळंकी डॉ. नितीन धर्मराव , शांतीलाल सेठीया, वर्धमान ढोले , धनराज सोळंकी, राजेश कंगळे , निलेश मुथा , शैलेश कंगळे , संजय सुराणा, शामराव कंगळे, साईल मुथा , सुधीर महाजन, जितेंद्र चोबारकर, आदेश कर्नावट, मनोज कंगळे , दिलीप कोंडेकर , वर्षा बडेरा, प्रार्थना चौबारकर , हर्षाली जोंधळे, डॉ प्रा अनुजा रोकडे,यांची उपस्थिती होती.

### महिलांच्या ढोल पथकाने लक्ष वेधले

भगवान महावीर यांच्या जयंती निमित्त निघालेल्या शोभायात्रेत सकल जैन समाजाच्या मुली व महिलांनी ढोल पथकाच्या माध्यमातून शिस्त व संस्कृतीचे दर्शन घडविले.हे पथक शहर वासियांसाठी आकर्षण ठरले.

### भगवान महावीर यांची शिकवण

भगवान महावीरांनी जगाला अहिंसा, सत्य , अस्तेय, अपरिग्रह व ब्रह्मचर्य ही पंचमहाव्रते आध्यात्मिक मुक्तीसाठी आवश्यक आहेत. याची शिकवण दिली. त्यांची ही शिकवण सकल जैन समाजाने अंगिकारून याचा प्रचार व प्रसार व्हावा. अशी अपेक्षा यावेळी विविध वक्त्यांनी व्यक्त केली.

# लग्नसराईची धूमधाम अन् वऱ्हाडी मंडळी होतेय गरमीने घामाघूम

## उन्हाच्या तडाख्यात लग्नांचा धुमधडाका सुरुच

**ज्योतिराम पाढंरपोटे । माजलगाव**

तालुक्यात सध्या लग्नसराईचा धुमधडाका सुरू झाल्याचे पाहण्यास मिळत आहे.मात्र, सध्या वाढत्या तापमानामुळे माजलगाव शहरासह तालुक्यातील वधु- वरा कडील वराडी मंडळींना चांगलाच त्रास सहन करावा लागत आहे. उन्हाचा पारा जोमाने वाढत असून, उन्हातान्हातून विवाहासाठी वऱ्हाडी मंडळी घामाघूम होत असल्याचे चित्र सध्या दिसत आहे. सध्या लग्नतिथी खूप मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे एप्रिल महिन्यात व मे महिन्यात काही लग्न तिथी असून लग्नसराईला चांगलाच वेग आल्याचे दिसत आहे.



सध्या एका गावात दिवसाकाठी दोन ते तीन विवाह होत आहेत.या विवाहासाठी पाणी टंचाईमुळे पाणी आणण्याकरीता वधूकडील मंडळींची चांगलीच धावपळ होत आहे. काही मंडळींकडील वधूपित्याला पाणी विकत घ्यावे लागत आहे.लग्नतिथी असल्याने वधू- वराकडील मंडळी वधू-वरांसाठी बाजारपेठेत कपडे, भांडे व सोने खरेदी करण्याकरीता मोठी गर्दी करीत असल्याने कपड्याचे,भांड्याचे व सोन्याचे दुकाने हाऊसफुल झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहेत.मात्र, वाढत्या तापमानामुळे माजलगाव तालुक्यातील वराडी मंडळीची दमछाक होतांना दिसत आहे.

### डी.जे.संस्कृतीने हरपला बँडबाजा

लग्नसराई म्हटलं की जिथ तिथं सनई, चौघडा त्यानंतर बँडबाजा, तडमताशा, ढोलीबाजा आदी वाद्यांची धूम असायची.परंतु, काळाच्या ओघात या सर्व वाद्यावर डी.जे.ने कुरघोडी केल्याचे चित्र दिसत आहे.जिथे डि.जे. नसतो तिथे मात्र ढोलीबाजा आपले स्थान टिकवून आहे. परंतु, ढोलीबाजापेक्षाही डी.जे.च्याच तालावर नाचण्यासाठी आजची तरुण पिढी जास्त भर देत असल्याचे चित्र दिसून येत आहे. पूर्वी हळद लावल्यानंतर ते वऱ्हाडाच्या जाण्यापर्यंत सनईचा सूर ऐकावयास मिळत होता.त्यानंतर बँडने ती जागा घेतली. त्यानंतर ढोलीबाजाने त्याची जागा घेतली आणि काळाच्या ओघात ती जागा डी.जे.घेऊ लागला आहे.

### तरुण पिढी व्यसनाधीन, दारू असेल तर नाचू

सध्या लग्नसराईचा जोर वाढल्याचे दिसत असतांना दिवसाकाठी एका गावात दोन ते तीन विवाह होत असल्याचे दिसत आहेत.या विवाहांमध्ये परण्याच्या वेळेला नाचण्याकरीता तरुण वर्ग नवरदेवाकडे दारुची मागणी करतात,आणी नवरदेवांने दारू दिली तरच परण्यापुढे नाचू असा हट्ट वराकडील मित्रमंडळी करत असल्याचे दिसत आहेत.परंतु या डि.जे संस्कृतीने तरुण पिढीमध्ये व्यसनाधीना वाढतांना दिसून येत आहे.

# पाडळसिंगीत अखंड हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता ह.भ.प.रामराव महाराज ढोक यांचे काल्याचे कीर्तन संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी येथे श्रीमद्? भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताहाची शनिवार दि.२० एप्रिल रोजी एकलिंगेश्वर महादेव मंदिराच्या प्रांगणात सुप्रसिद्ध रामायणाचार्य ह.भ.प. गुरुवर्य रामराव महाराज ढोक, नागपूरकर यांच्या अमृततुल्य काल्याच्या कीर्तनाने उत्साहात सांगता झाली. यावेळी पंचक्रोशीतील संत - महंत, विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी तसेच महिला व पुरुष भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

ॐ ज्ञानेश अध्यात्म गीता मंडळ, समस्त गावकरी व एकलिंगेश्वर मित्रमंडळ पाडळसिंगी यांच्या वतीने गेल्या ७४ वर्षांपासून श्रीमद्? भागवत कथा व ४२ वर्षांपासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी ह.भ.प. महेश महाराज महाजन यांच्या सुमधूर वाणीतून भागवत कथा उत्साहात संपन्न झाली. तर सप्ताहात सात दिवस महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकारांची कीर्तन सेवा दिली. तर शनिवार दि.२० एप्रिल रोजी सुप्रसिद्ध रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांचे दुपारी १२ ते २ यावेळेत अमृततुल्य काल्याचे किर्तन संपन्न झाले यानंतर उपस्थित हाजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. संध्याकाळी ९ ते ११ पालखी



मिरवणुक तसेच एकलिंगेश्वर भजनी मंडळ व महिला भजनी मंडळ, पाडळसिंगीकर यांचा हरिजागर झाला. दरम्यान श्रीमद्? भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताहामुळे गावात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. सप्ताहात संत- महंत, सामाजिक शैक्षणिक, राजकीय, पत्रकारिता तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होते. सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी पाडळसिंगी ग्रामस्थांच्या वतीने विशेष परिश्रम घेण्यात आले.

# योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या नूतन कार्यकारिणीची बिनविरोध निवड चंद्रशेखर बर्दापुरकर अध्यक्ष तर कमलाकर चौसाळकर नवे सचिव

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी अग्रेसर असलेल्या योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी, ख्यातनाम अभियंता श्री. चंद्रशेखर बर्दापुरकर यांची तर सचिवपदी कमलाकर चौसाळकर यांची बहुमताने निवड करण्यात आली असून उर्वरीत कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी जी.बी. व्यास,कार्यकारी उपाध्यक्ष अॅड.जगदीश चौसाळकर, कोषाध्यक्षपदी डॉ. शैलेश वैद्य आदींची बिनविरोध निवड करण्यात आली असून संचालक म्हणून एन. के.गोळेगांवकर,एम.एस. लोमटे,भीमाशंकर शेटे, लंकेश वैद्य, आर.व्ही. सोनवळकर,अंगद कराड,प्रताप पवार, अभिजित लोहिया, सय्यद पाशुमियाँ,प्रा. जयश्री देशपांडे,अॅड. कल्याणी विर्धे आदींची निवड करण्यात आली आहे. यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

योगेश्वरी शिक्षण संस्थेची वाटचाल नेत्रदिपक -न्या. आर.एम.बोर्डे

योगेश्वरी शिक्षण संस्थेने स्वातंत्र्यपूर्व काळापासुन जतन असलेली परंपरा कायम ठेवून शैक्षणिक कार्यात नेत्रदिपक वाटचाल केली





म्हणूनच महाराष्ट्र व त्याबाहेर शिक्षणक्षेत्रात नैतिक दबदबा टिकवुन असल्याचे प्रतिपादन योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष तथा खंडपीठाचे निवृत्त न्यायमुर्ती आर.एम.बोर्डे यांनी केले.

ते संस्थेच्या सर्वसाधारण सभेत अध्यक्ष स्थानावरून मार्गदर्शन करताना बोलत होते ते म्हणाले की,योगेश्वरी शिक्षण संस्थेने त्या काळी गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची दिशा निश्चित करून आपले उद्धोषित ध्येय साकारले माजी विद्यार्थी,दानशुर दाते यांच्या आधारावर संस्थेने निष्ठापूर्वक शैक्षणिक कार्य केले म्हणुनच संस्थेचे मनोबल वाढलेले दिसते विभुतींनी सांगितलेला विचार रुजविण्याचे कार्यही अव्याहतपणे चालू असून संस्थेने शताब्दी महोत्सवही साजरा केला. यावेळी अहवालाचे वाचन करण्यात आले. सभासदांच्या प्रश्नांना उत्तरे देण्यात आली.डॉ.खुरसाळे यांनी संस्थेच्या एकूण प्रगतीबाबत माहिती सांगून सहकार्य केल्या बद्दल आभार मानले.कार्यक्रमाचे संचालन व आभार जी.बी.व्यास यांनी मानले यावेळी संस्थेचे सभासद,हितचिंतक, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# २८ एप्रिल रोजी मोफत त्वचारोग तपासणी शिबिर -डॉ. जेथलिया

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील जुना कोर्ट रोड, श्री सिद्धेश्वर महाविद्यालय च्या बाजूला असलेल्या जेथलिया हॉस्पिटल येथे २८ एप्रिल २०२४ रविवार रोजी बीड येथील प्रसिद्ध त्वचा रोग तज्ञ डॉ संजय बजाज यांचे मोफत त्वचा रोग तपासणी शिबीर यांचे सकाळी ११ ते ३या वेळेत आयोजित केले आहे तरी यांचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ ऋषिकेश जेथलिया यांनी केले आहे.

शहरात नव्यानेच झालेल्या जेथलिया हॉस्पिटल ला २८एप्रिल रोजी एक महिना होत असून या निमित्त बीड येथील प्रसिद्ध त्वचा रोग तज्ञ डॉ संजय सतिश बजाज यांच्या मोफत त्वचा रोग शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.या शिबिरात तरुणच्या चेहऱ्यावरील पीपल्स, वांग, काळे डाग, सोरायसिस, गजकर्ण तसेच केसाचे विकार, नखाचे विकार, गुप्तरोग, कुष्टरोग, सोंदर्यवर्धक उपचार यांची तपासणी करण्यात येणार आहे. सोबतच रक्त तपासणीवर ही ५०%पर्यंत ची सूट या दिवशी दिली जाणार आहे. तरी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ ऋषिकेश संतोषकमार जेथलिया यांनी केले आहे.

cmyk



# अवकाळी पावसामुळे राज्यातील १ लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान!

पुणे : राज्यात गेल्या १५ दिवसांपासून सातत्याने पाऊस अवकाळी पाऊस बरसत आहे. या पावसामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतमालाचे मोठे नुकसान झाले आहे. प्रामुख्याने उन्हाळ्याच्या दिवसात अधिक पिके नसतात. मात्र, मागील १५ दिवसांपासून अवकाळी पावसाने जवळपास राज्यातील २१ जिल्ह्यांना आपल्या कवेत घेतले आहे. ज्यामुळे राज्यात आतापर्यंत २१ जिल्ह्यांमध्ये एकूण ९७ हजार हेक्टरवरील पिकांना अवकाळी पावसाचा मोठा फटका बसला आहे. असा अंदाज राज्याच्या कृषी विभागाने व्यक्त केला आहे.

सध्याच्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या केळी, आंबा, द्राक्ष, डाळिंब या फळ पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. काही जिल्ह्यांमध्ये पंचनामे सुरु आहेत. तर अनेक जिल्ह्यांमध्ये निवडणुकीच्या प्रशिक्षणात व निवडणूक ड्युटीमुळे पंचनामे सुरु झालेले नाहीत, अशी स्थिती आहे.

ज्यामुळे नुकसानीच्या पंचनाम्यांची गती पाहता



मदतीसाठी आणखी काही दिवस बाधित शेतकऱ्यांना वाट पाहावी लागणार असल्याचे अधोरेखीत होत आहे. दरम्यान, यंदाच्या पावसाळ्यात पावसाचा मोठा खंड पडल्याने खरीप पिके संपूर्णतः वाया गेली. अजूनपर्यंत अनेक शेतकऱ्यांना सर्व पिकांचा पीकविमा मिळालेला नाही.

त्यानंतर राज्यातील ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झाला आणि त्या बाधित शेतकऱ्यांसाठी शासनाने मदत देखील मंजूर केली. मात्र, अनेक शेतकऱ्यांना दुष्काळी मदत देखील मिळालेली नाही. अशातच आता एप्रिलमधील अवकाळी पावसाचा फटका राज्यातील २१ जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांना बसला असून, त्यात जवळपास ९७ हजार हेक्टरवरील विशेषत: फळबागांना फटका बसला आहे.

### यंत्रणा जुंपली निवडणूक कामांना

वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे आंबे गळून पडले आहेत. आता ज्या भागात ३३ टक्क्यापेक्षा अधिक नुकसान झाले आहे. त्यांना सरकारी नियमाप्रमाणे भरपाई मिळेल. पण, त्यासाठी पंचनाम्यांचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून सरकारला सादर होणे आवश्यक आहे. मात्र, सध्या प्रशासन निवडणूक कामांसाठी जुंपल्याने, अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे होणार कधी? असा प्रश्न आता नुकसानग्रस्त शेतकरी उपस्थित करत आहे.

# भारताची कडधान्य आयात ६ वर्षांच्या उच्चांकावर!



पुणे : कडधान्याच्या कमी उत्पादनामुळे भारताने लाल मसूर आणि पिवळ्या वाटाण्यांच्या शुल्क मुक्त आयातीला परवानगी दिल्याने आर्थिक वर्ष २०२४ मध्ये भारतातील डाळींची आयात वार्षिक आधारे ८४% वाढून सहा वर्षांतील सर्वोच्च पातळीवर पोहोचली, असे सरकारी आणि उद्योग अधिकाऱ्यांनी सांगितले.

जगातील प्रथिनेयुक्त डाळींचा उत्पादक, सर्वात मोठा आयातदार, आणि ग्राहक असलेल्या भारताने केलेली उच्च आयात जागतिक किमतींना आधार देत आहे आणि कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि म्यानमार सारख्या निर्यातदार देशामधील साठा खाली आणण्यास मदत करत आहे. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षात भारताने ४.६५ दशलक्ष मेट्रिक टन कडधान्ये आयात केली, जी आर्थिक वर्ष २०१८ नंतरची सर्वाधिक आहे आणि एका वर्षापूर्वी आयात केलेल्या २.५३ दशलक्ष टनांपेक्षा जास्त आहे, असे एका सरकारी अधिकाऱ्याने नाव सांगण्यास नकार दिल्याने तात्पुरती माहिती सांगितली.कमी उत्पादन आणि निवडणुकीपूर्वी किंमती खाली आणण्याच्या प्रयत्नात आयात कर रद्द करण्याच्या सरकारच्या निर्णयामुळे आयातीत वाढ झाली असे जागतिक व्यापार संघटनेच्या एका डीलरने सांगितले. "गेल्या वर्षी लाल मसूर आणि पिवळ्या वाटाण्याच्या आयातीत मोठी वाढ झाली होती. काळ्या हरभऱ्याची आयातही वाढली," असे डीलर म्हणाले.

शीख फुटीरतावादी नेत्याच्या हत्येवरून राजनैतिक ताणतणाव असतानाही कॅनडातून भारताची लाल मसूरची आयात वर्षभरात दुप्पट होऊन सुमारे १.२ दशलक्ष टन झाली आहे, असे सरकारी अधिकाऱ्याने सांगितले. नवी दिल्लीने डिसेंबरमध्ये शुल्कमुक्त आयातीला परवानगी दिल्यानंतर अलीकडच्या काही महिन्यांत रशिया आणि तुर्कीमधून पिवळ्या वाटाणा आयातीत वाढ झाली आहे, असे नवी दिल्लीतील एका व्यापार्याने सांगितले. उत्पादनातील कमतरता भरून काढण्यासाठी भारताने तूर आणि चणे देखील आयात केले आहे. दक्षिण आशियाई देश सामान्यत: कॅनडा, म्यानमार, ऑस्ट्रेलिया, मोझांबिक आणि टांझानिया येथून डाळी आयात करतो.

# पपईवरील घातक विषाणूजन्य रोगांचे वेळीच करा नियंत्रण!

पपई पिकांवर येणारे सर्वात घातक रोग म्हणजे विषाणूजन्य रोग. या रोगामुळे दरवर्षी ४० टक्के पेक्षा जास्त पपईचे उत्पादन प्रभावित होते. या रोगाचा प्रसार प्रामुख्याने विषाणू प्रसार करणाऱ्या किडींमार्फत होतो. या किडींचे नियंत्रण करण्यासाठी वापरायच्या कीटकनाशक फवारणीला मर्यादा आहेत. त्यामुळे बहुतेक शेतकरी विषाणूजन्य रोगासाठी जास्तीत जास्त प्रतिबंधक उपाय करतात. कारण एकदा हे रोग पिकांवर आले तर यांचे नियंत्रण करणे अवघड असते.



रिंग स्पॉट व्हायरस : पपईवरील रिंग स्पॉट व्हायरस हा विषाणू या रोगास कारणीभूत आहे. मावा या रसशोषक किडीमुळे या रोगाचा प्रसार मोठ्या प्रमाणात होतो. सुरवातीला पाने फिकट हिरवी व पिवळसर होतात. पानाच्या शिरा हिरव्या दिसू लागतात. पानाच्या वरील बाजूस शिरा मुरडतात. हिरव्या फळावर अनेक वर्तुळाकार, पाणीदार डाग दिसतात. रोगग्रस्त झाडांची फळे लहान व वेडीवाकडी दिसतात.

एकात्मिक नियंत्रण उपाय : सुरवातीच्या अवस्थेतच रोगग्रस्त झाड मुळासकट उपटून, जाळून टाकावे.

मावा किडीच्या नियंत्रणासाठी शेतात एकरी २० पिवळे चिकट सापळे लावावेत. कुंपणावर/बांधावर मका आणि ज्वारी ही पिके लावावीत. बागेजवळ काकडीवर्गीय पिकांची लागवड करू नये. नत्राची संतुलित प्रमाणात मात्रा द्यावी. पालाशयुक्त खतांचा शिफारशीनुसार संतुलित वापर करावा. डायमेथोएट १.५ मिली त्यानंतर १५ दिवसांच्या अंतराने निंबोळी अर्क (१०,००० पीपीएम) ५ मिली प्रति लिटर पाणी फवारणी करावी.

पाने मुरडणे / लीफ कल : याविषाणू रोगाचा प्रसार पांढऱ्या माशीमुळे होतो. या रोगाच्या प्रादुर्भावाने पपईच्या झाडाची पाने मुरडतात, पाने वेडीवाकडी होतात आणि पानांचा आकार लहान राहतो. पाने चामड्यासारखी व ठिसूळ होतात, झाडाची वाढ खुंटते, झाडाला कमी प्रमाणात फुले आणि फळे येतात, त्यामुळे उत्पादनावर परिणाम होतो.

एकात्मिक नियंत्रण उपाय : संक्रमित रोपे आणि झाडे काढून नष्ट करावीत. पीक फेरपालट करावे. रोगप्रतिकारक वाणांची लागवड करावी. उदा. सनराईज सोलो, रेड लेडी, ताइनुंग १, माराडोल रोजा (पूर्ण प्रतिरोधक). कूर्ग हनी ड्यू, पुसा डेलिशियस आणि पुसा ड्वार्फ (मध्यम प्रतिरोधक वाण) . पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी पिवळे चिकट सापळे वापरा, लेडीबग्स आणि लेसविंग्स यासारखे परभक्षी कीटकांचे संवर्धन करा. मोनोक्रोटोफॉस ५ मिली १० लिटर पाण्यात किंवा डायमेथोएट ३ मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी जेणेकरून किडीचे नियंत्रण होऊन शेतातील रोग कमी होईल.

मोझॅक किंवा केवडा : या विषाणूजन्य रोगाचा प्रसार मावा किडीमुळे होतो. झाडावर नवीन येणारी पालवी पिवळसर दिसते, पानाच्या शिरा हिरव्या दिसून पाने हाताला चरचरीत लागतात. व त्यावर पिवळसर हिरवे चट्टे दिसून येतात. रोगग्रस्त झाडांची फळे आकाराने लहान व वेडीवाकडी होतात, रोगाची तीव्रता जास्त असल्यास पिवळी पाने टोकाकडून वाळत जातात. उत्पादनात लक्षणीय घट होते.


एकात्मिक नियंत्रण उपाय : निंदणी, कोळपणी करून शेत स्वच्छ ठेवावे. आर्द्रता कमी व तापमान जास्त असलेल्या काळात रोपांची लागवड करावी. पपई भोवती वेलवर्गीय पिके घेऊ नयेत. पपईच्या बागेत मावा किडीचा शिरकाव टाळण्यासाठी बागेभोवती उंच पीक लावून अडथळा निर्माण करावा. पईची बाग लावण्यापूर्वी बागेभोवती तीन ते चार महिने अगोदर केळीच्या झाडांचे चार ते पाच ओळी लावल्यास मावा कीड बाहेरून पपईच्या बागेत येण्यास अडथळा निर्माण होतो. व त्यामुळे विषाणूजन्य रोगाचा प्रसार कमी होतो. मावा किडीचा प्रादुर्भाव दिसताच १० मिली डायमिथोएट किंवा ऑक्सिडिमेटॉन मिथाईल व १०० मिली निमअर्क प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.

# वसंतराव नाईक वैयक्तिक, गट कर्ज योजने अंतर्गत १ लाखापर्यंत बिनव्याजी कर्ज

पुणे : सुशिक्षित बेरोजगार व गरजू व्यक्तींनी व्यवसाय करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सरकारच्या थेट कर्ज योजने अंतर्गत व्यवसाय सुरू करण्यासाठी एक लाख रूपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज मिळण्याची सुविधा उपलब्ध केली आहे.

मत्स्य व्यवसाय, कृषी क्लिनिक, पॉवर टिलर, हार्डवेअर शॉप, पेंट शॉप, सायबर कॅफे, संगणक प्रशिक्षण, झेरॉक्स, स्टेशनरी, सलुन, ब्युटी पार्लर, मसाला उद्योग, पापड उद्योग, मसाला मिर्ची कांडप उद्योग, वडापाव विक्री केंद्र, भाजी विक्री केंद्र, ऑटोरिक्षा, चहा विक्री केंद्र, सॉफ्ट टॉईज विक्री केंद्र, डी. टी. पी. वर्क, स्विट मार्ट, ड्राय क्लिनिंग सेंटर, हॉटेल, टायपिंग इन्स्टीट्युट, ऑटो रिपेअरींग वर्कशॉप, मोबाईल रिपेअरिंग, गॅरेज, फ्रिज दुरूस्ती, ए. सी. दुरुस्ती, चिकन शॉप, मटन शॉप, इलेक्ट्रिकल शॉप, आईस्क्रिम पार्लर, मासळी विक्री, भाजीपाला विक्री, फळ विक्री, किराणा दुकान, आठवडी बाजारामध्ये छोटसे दुकान, टेलिफोन बुथ, अन्य तांत्रिक लघु उद्योग.

वसंतराव नाईक कर्ज योजने अंतर्गत आवश्यक कागदपत्रे : आधार कार्ड संलग्न बँक खात्याचा तपशील, उत्पन्नाचा दाखला (अर्जदाराचे एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रू. १.०० लाखापेक्षा जास्त नसावे), रहिवासी दाखला, आधार कार्ड, रेशन कार्ड, पासपोर्ट साईज फोटो, जातीचा दाखला, शपथपत्र.




या योजने अंतर्गत दिले जाणारे प्राधान्य : शासनाच्या कौशल्य विकास विभागा मार्फत तसेच शासकिय/निमशासकीय संस्थांमधून तांत्रिक प्रशिक्षण घेतलेली तसेच अनुभवी तरूण मुले/मुली यांना प्राधान्य देण्यात येईल. निराधार, विधवा महिला इ. लाभार्थींना तात्काळ प्राधान्य.

कर्ज वितरण हप्त्याचे स्वरूप : कर्ज योजनांसाठी योग्य लाभार्थ्यांची निवड व मंजूर प्रकरणात आवश्यक वैधानिक दस्तऐवज पूर्तता केल्यानंतर कर्ज वितरण हप्त्याचे स्वरूप खालील प्रमाणे होते. या कर्ज योजने अंतर्गत मिळणाऱ्या एक लाखांपैकी पहिला हप्ता (७५ %) म्हणजेच ७५ हजार रुपये इतका दिला जाईल. सरा हप्ता २५ हजार रुपये प्रत्यक्ष (लघु-उद्योग) व्यवसाय सुरू झाल्यानंतर साधारणतः ३ महिन्यांनंतर जिल्हा व्यवस्थापकांच्या तपासणी अभिप्रायानुसार उर्वरित २५% रक्कम उपलब्ध करून दिला जाईल. नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या लाभार्थींना व्याज आकारण्यात येणार नाही. नियमित ४८ समान मासिक हप्त्यामध्ये मुद्दल रू. २०८५/- परतफेड करावी लागेल. नियमित कर्जाची परतफेड न करणा-या लाभार्थींना जेवढे कर्जाचे हप्ते थकीत होतील, त्या रक्कमेवर द.सा.द.शे. ४% व्याज आकारण्यात येईल.

योजनेच्या अटी व शर्ती : अर्जदाराचे वय १८ ते ५५ वर्षे असावे. अर्जदाराने आधार कार्ड संलग्न बँक खात्याचा तपशील सादर करावा. एका वेळी कुटुंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल. अर्जदार महामंडळाच्या कोणत्याही (केंद्र व राज्य) योजनेचा थकबाकीदार नसावा. अर्जदाराचे एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रू. १.०० लाखापेक्षा जास्त नसावे. महाराष्ट्राचा रहिवासी असावा, तसेच अर्जदार विमुक्त जाती/भटक्या जमाती/विशेष मागास प्रवर्गातील असल्यास प्राधान्य.

कर्ज वसूली कार्यपध्दती : कर्ज वितरित केल्यानंतर कर्जाची परतफेड ही कर्ज वितरीत केल्याच्या ९० दिवसांनंतर सुरू करण्यात येईल. कर्ज परताव्याचे मासिक हप्ते ठरवून द्यावेत व कर्ज वसुलीच्या दृष्टीने लाभार्थ्याकडून पुढील दिनांकांचे आगाऊ धनादेश घेऊन तसेच (इलेक्टॉनिक क्लिअरन्स सिस्टम) पद्धतीने वसूली करण्यात यावी.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### जागतिक ग्रंथ तथा रचनास्वायत्त दिन

### महत्वाच्या घटना

१६३५ : अमेरिकेतील पहिली सार्वजनिक शाळा बोस्टन लॅटिन स्कूल स्थापन झाली.
१७७४ : ब्रिटीश कमांडर कर्नल चेम्पमेन यांनी रोहिलखंड येथील रोहिला सेनेचा पराभव करून रोहिलखंड आपल्या ताब्यात घेतले.
१८१८ : दोनशे युरोपियन व दोनशे एतद्देशीय शिपायांसह इंग्रज अधिकारी मेजर हॉल यास कर्नल प्रॉयर याने रायगड किल्ल्याची टेहळणी करण्यास पाठविले. चैत्र व. ३
१८९१ : रुस देशाची राजधानी मास्को येथिल यहुदी धार्मिक लोकांना देशाबाहेर काढून देण्यात आले.
१९३५ : युरोपियन राष्ट्र पोल्लंड ने संविधान आमलात आणले.
१९८४ : वैज्ञानिकांनी एड्स या विषाणूचा शोध लावला.
१९९० : नामिबिया संयुक्त राष्ट्रांत प्रवेश होऊन तो १६० वा सदस्य देश बनला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५६४ : विल्यम शेक्सपियर, इंग्लिश साहित्यिक.
१५६४ : विल्यम शेक्सपिअर – इंग्लिश नाटककार आणि अभिनेता. युनेस्कोने घेतलेल्या पुढाकारामुळे विल्यम शेक्सपिअर यांच्या सन्मानार्थ १९९५ पासून आजचा दिवस हा 'जागतिक पुस्तक दिन' म्हणून साजरा केला जातो. (मृत्यू: २३ एप्रिल १६१६)
१७९१ : जेम्स बुकॅनन – अमेरिकेचे १५ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: १ जून १८६८)
१८५८ : मॅक्स प्लॅंक – नोबेल पारितोषिक विजेते जर्मन भौतिक शास्त्रज्ञ (मृत्यू: ४ आक्टोबर १९४७)
१८५८ : पंडिता रमाबाई – विधवा, परिक्त्यक्ता आणि स्त्रियांच्या सर्वांगीण उद्धारासाठी कार्य करणाऱ्या समाजसुधारक आणि 'आर्य महिला समाज' च्या संस्थापिका, संस्कृत पंडित (मृत्यू: ५ एप्रिल १९२२)
१८७३ : महर्षि विठ्ठल रामजी शिंदे – अस्पृश्यता निवारण हे जीवनध्येय मानलेले व्यासंगी समाजसुधारक (मृत्यू: २ जानेवारी १९४४)
१८९७ : लेस्टर बी. पिअर्सन = कॅनडाचे १४ वे पंतप्रधान आणि नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: २७ डिसेंबर १९७२)
१९२७ : हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या गायिका व सर्बहार वादक अन्नपूर्णा देवी यांचा जन्मदिन.
१९३८ : एस. जानकी – शास्त्रीय गायिका
२००५ : मी ॲट द झू हा पहिला व्हिडिओ युट्यूब वर प्रकाशित झाला.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६१६ : विल्यम शेक्सपिअर इंग्लिश नाटककार आणि अभिनेता. युनेस्कोने घेतलेल्या पुढाकारामुळे विल्यम शेक्सपिअर यांच्या सन्मानार्थ
१९९५ : पासून आजचा दिवस हा 'जागतिक पुस्तक दिन' म्हणून साजरा केला जातो. (जन्म: २३ एप्रिल १५६४)
१८५० : विल्यम वर्डस्वर्थ – काव्यातील स्वच्छंदतावादाचे प्रणेते इंग्लिश कवी. त्यांची 'डॅफोडिल्स' ही अतिशय गाजलेली कविता आहे. (जन्म: ७ एप्रिल १७७०)
१९२६ : हेन्री बी. गुप्पी – ब्रिटिश वनस्पतीशास्त्रज्ञ (जन्म: २३ डिसेंबर १८५४)
१९५८ : शंकर श्रीकृष्ण देव – निष्ठावान समर्थभक्त, समर्थ वाङ्मयाचे आणि संप्रदायाचे अभ्यासक व प्रकाशक (जन्म: १० आक्टोबर १८७१)
१९६८ : संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय पटियाला घराण्यातील हिंदुस्थानी शास्त्रीय गायक उस्ताद बडे गुलाम अली खान यांचे निधन.
१९७३ : हिंदी आणि ब्रजभाषेतील प्रख्यात कवी आणि लेखक धीरेंद्र वर्मा याचं निधन.
१९९२ : सत्यजित रे – ख्यातनाम चित्रपट निर्माते व दिग्दर्शक आणि भारतरत्न. 'पथेर पांचाली' या त्यांच्या पहिल्याच चित्रपटाला देशविदेशात अनेक गौरव मिळाले. त्यांना विशेष ऑस्कर पुरस्कारही देण्यात आला होता. (जन्म: २ मे १९२१)
२००० : मराठी चित्रपटांना आधार मिळावा या ध्येयाने प्रेरित होऊन गेली ४० वर्षे लालबागमधील 'भारतमाता' चित्रपटगृह चालवणारे यशवंत सदाशिव ऊर्फ बाबासाहेब भोपटकर यांचे निधन.
२००१ : जयंत श्रीधर तथा जयंतराव टिळक – संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे एक नेते, गोवा मुक्ती संग्रामातील एक झुंजार सेनापती, लोकमान्य टिळकांचे नातू, राजकारण, समाजकारण, साहित्य, पत्रकारिता, तत्त्वज्ञान, विज्ञान, निसर्ग आणि शिकार इ. विविध क्षेत्रांमधे दीर्घकाळ सक्रिय असणारे महाराष्ट्र विधान परिषदेचे अध्यक्ष व केसरीचे संपादक (जन्म: १२ आक्टोबर १९२१)
२०१३ : शमशाद बेगम – पार्श्वगायिका (जन्म: १४ एप्रिल १९१९).

## कोतवालाच्या कुटुंबीयांना कृषी विभागाकडून आर्थिक मदत

संग्रामपूर तालुक्यात तीन दिवसांपूर्वी काटेल कोलद शिवारात अवैध वाळू उपसा करणाऱ्या ट्रॅक्टरने धडक दिल्याने कोतवालाचा मृत्यू झाला होता. मृत्यू झालेला कोतवाल अत्यंत सामान्य कुटुंबातील असल्याने या कुटुंबाला तालुक्यातील कृषी अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आर्थिक मदत दिली. ही मदत शनिवारी (ता. २०) कुटुंबाकडे सुपूर्द करण्यात आली.

एकलारा गावातील लक्ष्मण अस्वार हे कोतवाल म्हणून कार्यरत होते. तीन दिवसांपूर्वी रात्री काटेल कोलद शिवारात वाण नदीपात्रातून वाळूचा उपसा सुरू असल्याची माहिती मिळाल्याने ते महसूल पथकासह तेथे गेले होते. अवैध उपशाला पायबंद घालण्यासाठी पथकाने कारवाई करण्याचे धाडस केले. या वेळी ट्रॅक्टर चालकाने कोलवात अस्वार यांच्या अंगावर ट्रॅक्टर घातला. यात ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना तातडीने अकोला येथे औषधोपचारासाठी भरती केले गेले. मात्र, तेथे त्यांचा मृत्यू झाला. अस्वार हे अत्यंत सामान्य कुटुंबातील होते. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता तालुका कृषी अधिकारी अमोल बनसोडे यांनी पुढाकार घेत आर्थिक मदत गोळा केली. ही मदत शनिवारी (ता. २०) तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील कर्मचारी, अधिकाऱ्यांनी भेट देऊन सुपूर्द केली. या वेळी गावातील नागरिक उपस्थित होते

# निजामकालीन पोलिस स्टेशन नव्याने बांधण्याच्या सुधीर मुनगंटीवार यांच्या घोषणेचं काय झालं?

## पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांना निवेदन






बीड । प्रतिनिधी

देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात मराठवाडा प्रदेशाच्या स्वातंत्र्याची ७५ वर्षे साजरी करत असताना सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मराठवाड्यातील ७० निजामकालीन पोलिस ठाण्यांच्या ईमारती नविन बांधण्याची घोषणा केली होती.मात्र निजामकालीन पोलिस ठाण्याच्या ईमारती कालबाह्य झाल्या असुन वापरण्यास योग्य नसल्याने नेकनुर पोलिस येथील पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना पत्र्याच्या शेडमध्ये काम करावे लागत असुन सुधीर मुनगंटीवार यांच्या घोषणेचं नेमकं काय झालं असा सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी केला असुन नेकनुर पोलिस ठाण्याची निजामकालीन ईमारत कालबाह्य झाली असुन पोलिस वसाहत पाडुन वर्षभरापेक्षा जास्त कालावधी झाला असुन सन २०२१-२२ मध्ये जवळपास ६ कोटी ३४ लाख निधी मंजूर होऊनही अद्याप ईमारत बांधकामाला मुहूर्त मिळाला नसुन सध्याची ईमारत पोलिस ठाण्यासाठी अपुरी पडत असुन गैरसोय होत असल्याने आधिका-यांना पत्र्याच्या शेडमध्ये काम करावे लागत आहे.तसेच पोलिस वसाहत वर्षभरापूर्वी पाडली असुन अद्याप बांधकाम सुरू नसुन कर्मचाऱ्यांना किरायाच्या घरात रहावे लागत असुन तातडीने पोलिस ठाणे ईमारत व पोलीस वसाहत बांधकाम सुरू करण्यात यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्यासह शेख युनुस,सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार यांनी पोलिस अधीक्षक बीड नंदकुमार ठाकूर यांच्या मार्फत मुख्यमंत्री, गृहमंत्री यांना केली आहे.

नेकनुर येथील पोलिस ठाण्याची इमारत निजाम कालीन असुन येथील ईमारत व वसाहत वापरण्यास व राहण्यास योग्य नसल्याने मध्यंतरी नविन ईमारत बांधण्याचा निर्णय घेण्यात आला.यासाठी २०२१-२२ मध्ये जवळपास ६ कोटी ३४ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला होता. येथील पोलिस ठाणे अंतर्गत जवळपास ८१ गावांचा कारभार चालतो.यामध्ये नेकनुर, चौसाळा लिंबागणेश,मांजरसुंभा ,येळंब यासारखी मोठी गावे येतात. याठिकाणी ४ अधिकारी आणि ४० कर्मचारी कार्यरत आहेत.पोलिस स्टेशनसाठी प्रशस्त जागा असुन आणि शासनाकडून निधी मंजूर होऊन वर्ष उलटूनही बांधकामास सुरुवात नाही. पोलिस स्टेशनची इमारत वापरण्यास कालबाह्य झाली असुन ती सध्या अपुरी पडत असल्याने आधिका-यांना काम करण्यास पत्र्याचे शेड तयार करण्यात आले आहे.

पोलिस स्टेशनचा आवाका व कारभार मोठा असल्याने याठिकाणी घडणाऱ्या गुन्ह्यांची संख्या मोठी असते.पोलिस स्टेशनची ईमारत छोटी असल्याने पोलिसांना काम करण्यास अडचणी निर्माण होतात.पोलिस अधिकारी व कर्मचारी यांना आपले कर्तव्य बजावताना अडचणींचा सामना करावा लागत आहे.त्यामुळे शासनाने पोलिस ठाण्याची ईमारत तातडीने बांधण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. नेकनुर पोलिस ठाणे अंतर्गत ४ अधिकारी आणि ४० कर्मचारी कार्यरत आहेत.याठिकाणी पोलिसांना राहण्यासाठी घरे देखील होती.परंतु येथील वसाहत राहण्यास व वापरण्यास योग्य नसल्याने नविन बांधण्याचा निर्णय घेण्यात आला.त्यानंतर येथील वसाहत पाडुन वर्षभरापेक्षा जास्त कालावधी उलटूनही अद्याप बांधकामाला सुरुवात नाही त्यामुळे अधिकारी, कर्मचाऱ्यांना किरायाच्या घरात रहावे लागत आहे.

# मराठा बांधवांनी मोठ्या संख्येने ८ जुनला नारायणगडावर यावे-मनोज जरांगे



अंमळनेर । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत कोणाला मतदान करा हे सांगणार नाही, परंतु ज्याला पाडायचे त्याला ईतके ताकतीने पाडा की त्यांच्या पाच पिढ्या निवडणुक लढणार नाहीत ईतक्या मताने पाडा असे अवाहन करीत विधानसभेला राज्यात ९२ मतदार संघावर मराठा समाजाचे प्राबल्य असल्याने विधानसभा निवडणुकीत संपुर्ण ताकतीने उतरणार असल्याची घोषणा मराठायोद्धा मनोजदादा जरांगे यांनी करीत ८ जुन रोजी नारायणगड येथे होणार्या विशाल सभेला अंमळनेर परिसरातील घराघरातील मराठा समाजाने मोठ्या संख्येने उपस्थित राहवे असे अवाहन केले.

पुणे येथून धामणगाव - अंमळनेर मार्गे बीडला जात असताना गावोगावी त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले . अंमळनेर येथे छोटेखानी स्वागताला मोठे स्वरूप येत मोठ्या संख्येने समाजबांधव एकवटला होता. गावात येताच ढोलताशांच्या गजरात त्यांचे स्वागत करण्यात आले. वाजत गाजत त्यांची मिरवणूक काढण्यात आली. स्वागतसभारंभानंतर छोटेखानी कार्यक्रमात त्यांनी समाजबांधवांना संबोधित केले ते म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण मिळत नव्हते त्यामुळे समाजाची मुले नौकरी, शिक्षणापासून वंचित राहत होती, आता कुणबी नोंदी सापडल्याने मराठा समाजाला आरक्षण मिळत आहे. सगेसोयरे यांची मागणी बाकी आहे ती देखील मागणी पुर्ण करण्यासाठी माझ्या जिवाची बाजी लावीत आहे, आणि हे मिळाल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही, भले यासाठी माझा जीव गेला तरी बेहत्तर असे सांगत मराठा समाजाने एकत्र येणे काळाजी गरज आहे. झालेली एकजुट फुटु देऊ नका, लोकसभा निवडणुकीत कोणत्याच पक्षाच्या प्रचाराला जाऊ नका, कोणाला मतदान करा हे सांगणार नाही परंतु ज्याला पाडायचेय त्याला ईतक्या मताने पाडा की, त्यांच्या पाच पिढ्या निवडणुकीत कोणी उभा राहीले नाही पाहिजे. पाडण्यात देखिल मोठा विजय असतो असे सांगितले. या प्रसंगी मोठ्या संख्येने मराठा समाज उपस्थित होता.

# डॉ. ज्योती मेटे पुन्हा अध्यात्मिक व सामाजिक कार्यक्रमांमध्ये सक्रिय

## खडकीघाट येथील यशस्वी तरुणांचा सत्कार



बीड । प्रतिनिधी

लोकनेते विनायकरावजी मेटे साहेब यांच्या विचारांचा वसा आणि वारसा यशस्वीपणे सांभाळणाऱ्या शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी काही तासापूर्वीच समाजासाठी लोकसभा निवडणुकीतून माघार घेतल्यानंतर बीड तालुक्यातील अनेक अध्यात्मिक, पारिवारिक व सामाजिक कार्यक्रमास उपस्थित राहून सामाजिक संवेदनशीलतेचे दर्शन घडवले आहे.यामध्ये मौजे सिरसमार्ग ता. गेवराई येथे श्रीक्षेत्र नारायण गडाचा नारळी अखंड हरिनाम सप्ताह व संगीत तुलसी रामकथा निमित्त आयोजित फुले टाकण्याचा कार्यक्रमास उपस्थित राहून भाविक भक्तांशी संवाद साधला तद नंतर खडकी घाट येथील अभिमान वाघ यांचे वृद्धपकाळाले दुःखद निधन झाले त्यांचा मुलगा अजित वाघ व परिवारास भेट देऊन सांत्वन केले.यादरम्यान शिवसंग्राम परिवारातील व हितचिंतकांच्या कौटुंबिक कार्यक्रम व लग्न सोहळ्यास उपस्थित राहून त्यांनी शुभेच्छा दिल्या.तसेच बीड तालुक्यातील खडकी घाट येथील ग्रामीण भागातील तरुणांनी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून स्वतःचे स्वप्न पूर्ण केले . या यशस्वी गुणवंत तरुणांचा सत्कार डॉ.ज्योतीताई मेटे यांच्या हस्ते काल करण्यात आला .

खडकी घाट येथील सुरज भोसले जिल्हा परिषद जालना येथे शिक्षक म्हणून निवड झाली . तसेच उमेश ढास यांची नगर ग्रामीण विभागांमध्ये विद्युत सहायक म्हणून निवड झाली. याच गावातील विठ्ठल माने यांची तलाठी म्हणून बीड येथे व शिक्षक म्हणून जिल्हा परिषद जालना येथे दोन्ही ठिकाणी निवड झाली. रघुवीर कुरे यांची आरोग्य निरीक्षक परंडा येथे निवड झाली तसेच रौळसगांव येथील ऋषिकेश जाधव यांची पुणे ग्रामीण पोलीस मध्ये निवड झाली. या सर्व गुणवंत युवकांचा सत्कार शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या हस्ते करण्यात आला याप्रसंगी शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष नारायण दादा काशिद , श्री.नितीनजी लाटकर साहेब , तालुकाध्यक्ष नवनाथ प्रभाळे, रामदासजी नाईकवाडे , सचिन जाधव, गौतम जोगदंड , महिला जिल्हाध्यक्षा मनीषाताई कुपकर , शहर उपाध्यक्षा संगीताताई ठोसर, माजी सभापती मनीषाताई कोकाटे, शिवसंग्राम नेते ज्ञानेश्वर कोकाटे, गणेश साबळे , शैलेश सुरवसे, शिवराज उगले , सुहास मेटे मिडीया प्रमुख प्रा.पंडित शेंडगे व अन्य शिवसंग्राम पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# व्हिजन समर कॅम्पचा लाभ जास्तीत जास्त पालकांनी घ्यावा-संकेत मोदी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यु व्हिजन पब्लिक स्कुलच्या टॉडलर्स व्हिले प्रीस्कुच्या वतीने शहरातील ३ ते १४ मधील विद्यार्थ्यांसाठी ३ ते १० मे दरम्यान दररोज सकाळी ८.३० ते ११.३० या वेळेदरम्यान ''व्हिजन समर कॅम्प - २०२४'' चे आयोजन न्यु व्हिजन पब्लिक स्कुलच्या टॉडलर्स व्हिले प्रीस्कुल, मोदी लर्निंग सेंटर रिंग रोड या ठिकाणी करण्यात आल्याची माहिती संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत मोदी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

अंबाजोगाई शहरातील मोदी लर्निंग सेंटर येथील निसर्गरम्य आणि प्रदुषणविरहीत परीसर नेहमीच विद्यार्थ्यांना आर्कषित करतो.मागील नऊ वर्षांपासून सन २०१५ पासुन न्यू व्हिजन पब्लिक स्कुलच्या वतीने प्रतिवर्षी व्हिजन समर कॅम्पचे आयोजन केले जात आहे. प्रतिवर्षी या कॅम्पसाठी विद्यार्थी व पालकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.शहरात सातत्याने समर कॅम्पचे आयोजन करून विद्यार्थ्यांना न्यु व्हिजन पब्लिक स्कुलच्या वतीने बास्केट बॉल, कब्बडी, खो-खो तसेच अनेक इनडोअर गेम्स चे प्रशिक्षणही दिले जाते.या समर कॅम्प मध्ये योगा,मेडिटेशन ,म्युझिकल डान्स ,सामाजिक कौशल्य,आपल्या कपड्यांची तसेच वस्तूंची काळजी कशी घ्यावी, घोडेस्वारी ,पक्षी निरीक्षण,वाहतुकीचे नियम, कटपुतली शो,साधे विज्ञानाचे प्रयोग,ओरिगामी , इटीनरी मेकिंग, निंजा वॉरियर,वैदिक मॅथ्स ,रोप मल्लखांब,कॅलिग्राफी,कुंभार मामाच्या चाकावर मातीचे भांडे तयार करणे ,नाटक आणि भाषण कला त्याचबरोबर म्युझिकल रेन डान्स याचा समावेश असणार आहे.यावर्षीच्या व्हिजन समर कॅम्प चे विशेष आकर्षण म्हणजे समर चॅम्पस आंबेजोगाई शहरातील पहिला रियालिटी गेम शो , ज्यामध्ये वयोगट ७ ते ९ मधील विद्यार्थी जिंकू शकतात रोख रक्कम रुपये ११०००/-, आणि वयोगट १० ते १४ मधील विद्यार्थी जिंकू शकतात रुपये २१०००/- ची बक्षिसे. त्याचबरोबर दैनंदिन विविध ऍक्टिव्हिटीज मधून विद्यार्थ्यांची ग्रुप मध्ये निवड होईल आणि अंतिम सामन्यासाठी त्यांना निवडले जाईल . अंतिम सामना १० मे २०२४ रोजी खेळवाला जाणार आहे.त्याचबरोबर वयोगट ३ ते ६ वर्ष यांच्यासाठी दररोज विविध बक्षिसे जिंकण्याच्या संधीबरोबरच आणखी धमाल,मस्ती विद्यार्थ्यांना उपभोगता येणार आहे. विद्यार्थ्यांनी व्हिजन समर कॅम्प मध्ये प्रवेश घेउन नवीन मित्र मैत्रिणी सोबत आपल्या गुण कौशल्यात वाढ करून घ्यावी असेही आवाहन श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी यांच्यासह सल्लागार डॉ बी. आय. खडकभावी, डॉ.डी.एच. थोरात. प्रा. व्हि. बी. चव्हाण, प्राचार्य रेंजो आर चंद्रन, समन्वयक शिल्पा पोळ आणि सर्व शिक्षकवृंदांच्या वतीने करण्यात आले आहे.

## आज संध्याकाळी भीमजल्लोष

बीड । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक आदर्श शिंदे यांच्या भीमगीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपास्थीत राहण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून करण्यात आले आहे.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची संयुक्त जयंती साजरी करण्यासाठी आ. संदीप क्षीरसागर यांच्याकडून आदर्श शिंदे यांच्या भीमगीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. मंगळवार, दि.२३ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण (स्टेडियम) या ठिकाणी होणार आहे. दरम्यान या कार्यक्रमास उपस्थित राहणाऱ्या महिला भगिनी व पत्रकार बांधव यांच्यासाठी स्वतंत्र आणि विशेष बैठक व्यवस्था असणार आहे. जेणेकरून महिला भगिनी या कार्यक्रमाचा व्यवस्थित आनंद घेऊ शकतील असे नियोजन असणार आहे.

# मेंदू व मनगट मजबूत ठेवा कोणाला शरण जाण्याची गरज पडणार नाही- शितोळे महाराज

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील खरात आडगाव येथील हनुमान मंदिर येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताह तथा संगीत तुलसीराम कथा ह.भ. प. वनिताताई गात (आळंदी) यांची सुश्रव वाणीतून होत आहे तसेच श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याच्या निमित्ताने २१ मार्च रविवार रोजी रात्रौ ८:३० ते १०:३० या वेळेत आळंदी देवाची येथील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ. प.पांडुरंग महाराज शितोळे यांची कीर्तन सेवा संपन्न झाली यावेळी कीर्तन सेवेत त्यांनी आपण आपले मेंदू व मनगट मजबूत ठेवल्यास कोणालाही शरण जाण्याची गरज भासणार नाही तर आजचा दिवस शेवटचा म्हणून जगा आपण आनंदी झाल्याशिवाय राहणार नाही तसेच कीर्तन सेवेसाठी घेतलेल्या अभंगात महाराज म्हणतात आपला देह जर प्रारब्धाच्या स्वाधीन आहे तर त्याचा भार डोक्यावर घेऊन मी काष्ठी का होऊ?माजा सर्व काळ तुज्या



चिंतनात जावो हेच माझे तुझ्याकडे कायेने,वाचेणे, मनाने मागणे आहे हे दातारा याहून दुसरा काही लाभ मला या जन्मात दिसत नाही तुकाराम महाराज म्हणतात आता पर्यन्त संकटे सोशीत आलो आहे आणि या सर्व संकटाचे मूळ मी आणि माझे हा अभिमानाचा दोषच आहे आपण आपला काळ भगवंताच्या चिंतनामध्ये घातला पाहिजे भगवंतांचे चिंतन आपल्यावर आलेल्या संकटाचा सामना करण्याची ऊर्जा देते तर आपण कोणत्याही क्षेत्रात असू द्या त्यामध्ये पूर्ण व्यस्त रहा यश आल्याशिवाय राहणार नाही असा आहे हितोपदेश ह. भ. प. पांडुरंग महाराज शितोळे यांनी या कीर्तन सेवेतून दिला.यावेळी बाजार समितीचे लेखापाल उद्धव फपाळ, रामराव जाधव ,दौलत महाराज वगरे ,विठ्ठल महाराज जमदाडे,मधुकर महाराज कारकर,अजय महाराज शिंदे,व सचिन महाराज काष्टे यांची उपस्थिती होती. या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता २३ मार्च मंगळवार रोजी १० ते १२ या वेळेत ह.भ.प.अशोक महाराज पांचाळ (आळंदी) यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी कीर्तन सेवेचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक समस्त गावकरी मंडळी व नवतरुण युवक मंडळ खरात आडगाव यांनी केले आहे.

# दिव्यांग कर्मचारी जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग दूत म्हणून काम करणार - राजेंद्र लाड

आष्टी । प्रतिनिधी

राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट निर्देश दिल्यानुसार बीड जिल्ह्यातील दिव्यांग कर्मचाऱ्यांना बीड चे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी दिपाताई मुधोळ - मुंडे यांनी लोकसभा निवडणूक कामातून दिव्यांगांना वगळले असून तिव्र दिव्यांगत्व नसलेले पण त्यांच्या स्वइच्छेने काम करु शकणारे दिव्यांग बांधव बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात एक किंवा दोन ''पीडब्लूडी मतदान कक्ष'' अर्थात ''स्वावलंबी मतदान कक्ष'' तयार करण्यात येवून संबंधित कक्षामध्ये निवडणूक अधिकारी म्हणून काम करणार आहेत तसेच दिव्यांग कर्मचारी संघटनेचे जिल्हा, तालुका पदाधिकारी व सदस्य आता आपल्या मतदान असलेल्या मतदान केंद्रावर इतर दिव्यांगांना मतदान करण्यास प्रवृत्त करणार असून त्यांना मतदान केंद्रावर मतदान करण्यास येण्यासाठी सोयी उपलब्ध करुन देणार आहेत. यासाठी ते आपल्या मतदान केंद्रावर दि. १३ मे २०२४ रोजी ''दिव्यांग दूत'' म्हणून काम करुन राज्यात एक आगळेवेगळे राष्ट्रीय कार्य करुन निवडणूक विभागास हातभार लावणार आहेत. अशी माहिती दिव्यांग कर्मचारी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष तथा दिव्यांग मतदार बीड चे राजदूत राजेंद्र लाड यांनी दिली आहे.

पुढे त्यांनी असेही म्हटले आहे की, भारत हा लोकशाही प्रधान देश आहे. जगातील सर्वात यशस्वी लोकशाही म्हणून आपल्या भारत देशाकडे पाहिले जाते. ही लोकशाही यशस्वी करण्यामागे येथील नागरिकांचा म्हणजे मतदारांचा मोलाचा सहभाग आहे. कारण मतदारच आपल्या मतदानाव्दारे लोकप्रतिनिधींची निवड करत असतात. मतदान करणे हा प्रत्येक नागरिकाचा पवित्र हक्क आहे. लोकशाही प्रबळ, मजबूत व भक्कम करण्यासाठी प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क बजाविणे आवश्यक आहे. मतदान करणे सुद्धा देशसेवेचाच एक भाग आहे. लोकशाही सुदृढ व सक्षम असेल तर देशाच्या विविधांगी विकासाला चालना मिळण्यास, विकासाला गती येण्यास भरीव मदत होते. याच दृष्टीकोनातून या देशाचा नागरिक म्हणून प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क प्राधान्याने बजावणे नितांत गरजेचे आहे. किंबहूना मतदानाचा हक्क बजावणे म्हणजे राष्ट्रीय कर्तव्य बजावणे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मी एकट्याने मतदान नाही केलं तर काय फरक पडतो.

मतदानानिमित्त सुट्टी आहे. या सुट्टीचा आनंद उपभोगुया, कुठेतरी सहल काढुया. हे विचार म्हणजे नाकर्तेपणाचा कळस होतात. पण थेंबे थेंबे तळे साचे या उक्तीप्रमाणे एका - एका मतानेच मतांचा डोंगर उभा राहतो. यामुळे प्रत्येक व्यक्तीने मतदान करून आपला मतदानाचा हक्क बजावण्याबरोबरच लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी आपलाही खारीचा वाटा उपयुक्त होतो ही बाब गांभिर्याने लक्षात घ्यायला हवी. विशेष बाब म्हणजे निवडणूक आयोगाकडून दिव्यांग बांधवांची मतदार नोंदणी मोठ्या प्रमाणात व्हावी यासाठी विशेष प्रयत्न केले गेलेले आहेत. निवडणूकीत मतदानासाठी दिव्यांग बांधवांसाठी वेगवेगळ्या सुविधाही निवडणूक आयोग पुरविणार आहे.

दिव्यांग बांधवांनी व नवमतदारांनी आता होणाऱ्या निवडणूकीमध्ये आपला मतदानाचा हक्क बजावून एक सार्वभौम शक्तीशाली लोकशाही राष्ट्र उभारण्यास आपले मतदानाच्या स्वरुपात सहकार्य लाभावे हीच अपेक्षा. तद्रुसार निवडणूक विभाग दिव्यांगांचे शंबर टक्के मतदान होण्यासाठी वेगवेगळ्या सोयी उपलब्ध करुन देणार आहे. परंतु अनेक दिव्यांग बांधवांना चलनवलनास खुपच अडचण निर्माण होत असते. त्यामुळे त्यांच्यात न्युनगंड निर्माण झालेला असतो. यासाठी त्यांच्यातील न्युनगंड दूर करुन त्यांनी मोठ्या प्रमाणात मतदान करावे याकामी बीड जिल्ह्यातील सर्व दिव्यांगांच्या संघटना व त्यांचे पदाधिकारी आपआपल्या मतदान केंद्रावर इतर सर्व दिव्यांगांचे मतदान करुन घेण्यासाठी पूर्णवेळ ''दिव्यांग दूत'' म्हणून राष्ट्रीय कार्यास सहकार्य करणार आहेत. यासाठी जिल्ह्यातील दिव्यांग कर्मचारी, दिव्यांग सुक्षिशित बेरोजगार अशा वेगवेगळ्या संघटनेचे पदाधिकारी मोठ्या प्रमाणात मतदान जनजागृतीसाठी प्रत्यक्ष भेटी घेवून, फेसबुक, व्हॉटसअप आदी प्रसार माध्यामाद्वारे प्रचार व प्रसार करत आहेत. या राष्ट्रीय कार्यासाठी बीड चे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी दिपाताई मुधोळ - मुंडे यांच्या सुयोग्य मार्गदर्शनाखाली तसेच उपजिल्हा निवडणूक अधिकारी, मुख्यकार्यकारी अधिकारी, सहाय्यक आयुक्त समाजकल्याण, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक, विविध दिव्यांग संघटनेचे जिल्हा, तालुका पदाधिकारी यांच्या सहकार्याने ''दिव्यांग दूत'' म्हणून काम करणार असल्याचे जिल्हा नियंत्रण दिव्यांग मतदार समितीचे सदस्य तथा राजदूत राजेंद्र लाड यांनी शेवटी म्हटले आहे.

# धनगरवाडी-डोईठाण येथे उद्या काशीनाथ महाराज यांचे कीर्तन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील नागतळा येथील गणेशगड व नागनाथ संस्थानचे अध्यक्ष महंत काशीनाथ महाराज यांचा बारवा नारळी सप्ताह धनगरवाडी-डोईठाण येथे सुरु आहे. उद्या बुधवार दि.२४ एप्रिल रोजी नागतळा येथील श्री क्षेत्र नागनाथ देवस्थान व गणेशगड संस्थानचे अध्यक्ष महंत काशीनाथ महाराज यांचे काल्याचे कीर्तन सकाळी १० ते १२ यावेळेत होणार आहे. या सप्ताहात संत मदन महाराज संस्थानचे अध्यक्ष रामायणाचार्य बबन महाराज बहिरवाल यांची संगीत रामकथा सुरु आहे साधु संतांच्या आशीर्वादाने आणि महंत काशीनाथ महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली धनगरवाडी येथे दि.१७ ते दि.२४ एप्रिल २०२४ या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व संगीत रामकथा ज्ञानयज्ञ सोहळा सुरु आहे.सप्ताहात टाळ, विणा,पखवाज,ग्रंथ पुजन झाले आहे.

या सप्ताहात काकडाभजन,प्रवचन, विष्णु सहस्रनाम,गाथा भजन, दररोज दुपारी २ ते ५ पर्यत बबन महाराज बहिरवाल यांची सुश्राव्य संगीत रामायण कथा सुरु आहे.

सप्ताहात हरिपाठ, हरिकीर्तन होत आहे. या सप्ताहात प्रा.विजय महाराज राजपुरे यांचे प्रवचन, अशोक महाराज शास्त्री यांचे हरिकीर्तन, वशीष्ट महाराज तरटे यांचे प्रवचन, दयानंद महाराज कोरेगावकर कर्जत यांचे हरिकीर्तन, हरी महाराज शास्त्री ऋषीकेश यांचे प्रवचन, सोपान महाराज सानप यांचे हरिकीर्तन, विश्वनाथ महाराज ननवरे रामायणाचार्य, अरणगांव यांचे प्रवचन तर ज्ञानेश्वर महाराज तांबे ,चैतन्य महाराज कुंभार यांचे प्रवचन, सागर महाराज बोराटे, बाबासाहेब महाराज महापुरयांचे प्रवचन तर प्रकाश महाराज बोधले प्रकाश महाराज बोधले यांचे हरिकीर्तन झाले. आज मंगळवार दि.२३ एप्रिल रोजी सुदर्शन मुनी महाराज उदासीन यांचे प्रवचन तर मंगेश महाराज वराडे यांचे हरिकीर्तन.बुधवार दि. २४ एप्रिल रोजी नागतळा येथील श्री क्षेत्र नागनाथ देवस्थान व गणेशगड संस्थानचे अध्यक्ष महंत काशीनाथ महाराज यांचे काल्याचे कीर्तन सकाळी १० ते १२ यावेळेत होणार आहे. नंतर महाप्रसाद होईल.

# परळीत दिव्यांग बांधवांनी दिले पंकजाताई मुंडेंना 'विजयी भव' आशीर्वाद

## संसदेत दिव्यांग बांधवांचा आवाज बनून काम करेल; पंकजाताई मुंडेंच्या भाषणाने दिव्यांगही गहिवरले !

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

दिव्यांगांच्या जीवनात आनंद यावा यासाठी मी हात नसलेल्यांचे हात, दृष्टी नसलेल्यांची दृष्टी आणि शब्द नसलेल्यांचे शब्द होईल. तुमच्यात मला देव दिसतो. तुमच्यासाठी काही तरी करू शकेल एवढी शक्ती मला मिळावी. जीवात जीव असेपर्यंत तुमच्या सेवेसाठी कशाचाही विचार करणार नाही, तुमच्या आशीर्वादाने संसदेत तुमचा आवाज बनुन काम करेल अशा शब्दांत भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी आज दिव्यांग बांधवांची मने जिंकली. पंकजाताईंच्या भाषणाने गहिवरून गेलेल्या दिव्यांग बांधवांनी त्यांना मनापासून 'विजयी भव' चे आशीर्वाद दिले. दरम्यान पंकजाताई हे आश्वासक आणि विश्वासक नेतृत्व असून मंत्री असताना त्यांनी दिव्यांगांसाठी निधी वाढवून दिला, आता त्यांचेसाठी काहीतरी करण्याची




### पंकजाताई आश्वासक नेतृत्व : त्यांना साथ द्या–डॉ. संतोष मुंडे

वेळ आली आहे, त्यांना मोठया मताधिक्याने संसदेत पाठवा असं आवाहन दिव्यांग कल्याण मंत्रालय अभियानाचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे यांनी यावेळी केले.

पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ डॉ संतोष मुंडे यांच्या पुढाकाराने मोंढा विभागात दिव्यांग, विधवा, परितक्त्या, ज्येष्ठ नागरिक, माजी सैनिकांच्या संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी त्या बोलत होत्या. भाजपचे शहराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी, जि.प. गटनेते अजय मुंडे, नगरसेविका उमाताई समशेट्टे, शुभांगी गिते आदी याप्रसंगी उपस्थित होते.

दिव्यांग बांधवांच्या उपस्थितीने खचाखच भरलेल्या या संवाद बैठकीस मार्गदर्शन करताना पंकजाताई म्हणाल्या, तुमची एवढी मोठी संख्या मला अंतर्मुख करणारी आहे. कलियुगात आज कुणीही समाधानी नाही, तुमच्याकडे पाहून मला तुमच्यात देव दिसतो, किती हा उत्साह..असेच आशीर्वाद मला द्या. राजकारणात आज जातीवरून एकमेकांच्या अंगावर धावून जाणाऱ्या जगात तुमच्याकडून काहीतरी शिकले पाहिजे. ज्ञान आणि पैसा देण्याएवढी मी मोठी नाही पण तुम्हा सर्वांना विश्वास मात्र नक्की देईन.

### ताई तुम्ही उमेदवार नव्हे,खासदारच ;दिव्यांगांनी दिला आशीर्वाद

दिव्यांगांशी संवाद साधतांना स्वतः पंकजाताई गहिवरून गेल्या. अतिशय मनमोकळा संवाद साधत त्यांनी त्यांची मने जिंकली. प्रचंड उकाडा होत असतानाही पंकजाताईंचे मार्गदर्शन ऐकताना असंख्य दिव्यांग व्यक्ती विशेषतः महिला भावनिक झाल्या होत्या. ताई, तुम्ही या निवडणुकीतील केवळ उमेदवारच नव्हे तर खासदार आहात. देशातुन सर्वाधिक मतांनी निवडुन येण्यासाठी आम्ही आणि आमचे आशीर्वाद सर्व तुमच्यासोबत आहोत, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

### संसदेत तुमचा आवाज होईल

दिव्यांगांची सेवा ही सामाजिक कार्य करणाऱ्यांसाठी संधी आहे. समाजातील दुर्लक्षीत घटकांसाठी कार्य करण्याची शिकवण मला लोकनेते मुंडे साहेबांकडुन मिळाली आहे. खा.प्रितमताई यांनी खूप छान काम केलं. गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने दिव्यांगासाठी शिबीर घेवुन अनेक उपक्रम राबवत कृत्रिम अवयव, सायकल, कर्णबधीरांना कानाच्या मशिन असे साहित्य वाटप केले. तुमची साथ मिळाल्यास संसदेत तुमचा आवाज बनून काम करेल. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांना भेटून दिव्यांगाच्या समस्या त्यांच्या कानावर घालत प्रभावी योजना सुरु करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. राज्यात मी मंत्री असताना महिला बचतगटांना प्रोत्साहन देत शुन्य टक्के दराने कर्ज,महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ उपलब्ध करुन दिली.दिव्यांगासाठी नगरपालिका व ग्रामपंचायत अशा स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये मध्ये ५% स्वनिधी राखीव ठेवण्याचा निर्णय,दिव्यांगांच्या मानधनात वाढ असे निर्णय घेतले. महिला व दिव्यांग व्यक्तीसाठी अनेक उपक्रम राबविले असल्याचे पंकजाताईंनी सांगितले.

### दिव्यांग भवन उभारणार

दिव्यांग बांधवांची संख्या मोठी असुन त्यांना आपल्या हक्काच्या जागेत बसुन काम करता यावे यासाठी परळी शहरात लवकरच दिव्यांग व जेष्ठ नागरीकांसाठी भवन उभारणार असल्याचे पंकजाताई म्हणाल्या.

# जाती पातीचं नाही तर विकासाचं राजकारण करणाऱ्या वंचित बहुजन आघाडीला निवडून द्या - अशोक हिंगे

**बीड । प्रतिनिधी**

जाती पाती च नाही तर विकासा च राजकारण करणाऱ्या वंचित सोशिताच्या कमी येणाऱ्या वंचित बहुजन आघाडीला निवडून द्या असे आव्हान वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांनी केले ते वडवणी नेकनूर प्रचार सभेत बोलत होते

महाराष्ट्र मध्ये सर्वत्र जातीपातीच्या राजकारण चालू आहे विकासाच्या मुद्द्यावर कोणीही बोलत नाही मागे मोठ्या प्रमाणात वाढले आहे हे मुद्दे सोडून जातीपातीचा राजकारण करून पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न माहिती महाविकास आघाडी कडून केला जात आहे मात्र डॉक्टर बाबासाहेब




आंबेडकरांचे वंशज असलेले प्रकाश आंबेडकर यांची वंचित बहुजन आघाडी सतत वंचित शोषितांच्या प्रश्नावर काम करत आले आहे देशातील मोदी सरकारने एकीकडे महागाई वाढवली आहे त्यामुळे गोरगरीब जनतेचे जीवन जगणे मुश्किल झाले आहे कांद्यावर निर्यात बंदी घालून शेतकऱ्याला अडचणी टाकल्या गेली अनेक वर्षापासून बीड जिल्ह्यातील रेल्वे चा प्रश्न पडला आहे जिल्ह्यातील तरुणांना नोकऱ्या नाहीत हे काम आतापर्यंतच्या खासदाराने का केले नाही असा प्रश्न उपस्थित करत माहायुती, महाविकास आघाडी हे फक्त जातीचे राजकारण करतात असे सांगत विकासाचे राजकारण करणाऱ्या वंचित बहुजन आघाडीला निवडून द्या आसे आव्हान वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांनी केले आहे वडवणी व नेकनुर येथे मतदारातून अशोक हिंगे यांचे जोरदार स्वागत करण्यात आलेवंचित बहुजन आघाडीचे लोकसभा उमेदवार अशोक हिंगे पाटील यांचा आज नेकनुर येथे संपर्क दौरा यावेळी त्यांचे स्वागत व सत्कार केले. यामध्ये भीमराव पायाळ हर्षवर्धन गडशिंगे अशोक विद्याधर युवराज पायाळ धनराज पायाळ मनोज पायाळ स्वप्निल पवार रोशन दिवार अतुल धनवे लक्ष्मण रोशन धनवे यांच्यासह पंचकोशीतील मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बजरंग सोनवणे यांना केज शहरातून मताधिक्य देणार –रोडे

**केज । प्रतिनिधी**

साधी राहणीमान, उच्य विचारसरणी आणि प्रत्येक व्यक्तीशी जोडलेली नाळ या मुळे सर्वांना परिचित असणारे बजरंग बप्पा सोनवणे यांना आदरणीय खा सौ रजनीताई पाटील यांच्या नेर्तृत्वाखाली केज शहरातून मताधिक्य देऊन



विजयाचा गुलाल केज मधुन लावण्याचा निर्धार युवक काँग्रेसचे केज शहर अध्यक्ष सचिन रोडे यांनी केला महाविकास आघाडीचे उमेदवार शेतकरी पुत्र बजरंग बप्पा सोनवणे यांना सर्व सामान्य बहुजन जनतेने त्यांना निवडून देण्यासाठी ही निवडणुक जनेतेने हाती घेतली आहे

केज शहरा मध्ये बजरंग बप्पा सोनवणे हे नेहमीच जनतेच्या संपर्कात असल्याने त्यांना मतदान रुपी आशीर्वाद ही जनता नक्कीच देईल गेल्या दहा वर्षा पासुन रखडलेला विकास हा बजरंग बप्पा प्रत्येक गावागावात पोहचवतील हा विश्वास आहे.

# बीड लोकसभा मतदारसंघ निवडणूक : चौथ्या दिवशी ६ उमेदवारी अर्ज दाखल

**तीन अपक्ष तर तीन पक्षाकडून अर्ज दाखल, आजपर्यंत एकूण दहा उमेदवारी अर्ज**

**बीड । प्रतिनिधी**

३९ बीड लोकसभा मतदारसंघामध्ये आज चौथ्या दिवशी सहा नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात आले. ३९ बीड लोकसभा मतदारसंघातून आज ३ अपक्ष उमेदवारांनी अर्ज दाखल केले. यामध्ये शेख एजाज शेख उमर, भास्कर किसन शिंदे , तुकाराम विठोबा उगले



तर तीन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार यांच्या पक्षाकडून तीन अर्ज सादर करण्यात आले. दोन अर्ज बजरंग मनोहर सोनवणे यांचे आहेत तर एक सारिका बजरंग सोनवणे यांचा अर्ज आहे. या सर्व उमेदवारांनी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या समक्ष अर्ज सादर सादर केला. सोमवारी १४ इच्छुक उमेदवारांना २६ नामनिर्देशन पत्राचे वाटप करण्यात आले. आजपर्यंत एकूण ९४ इच्छुक उमेदवारांना २११ नामनिर्देशन पत्राचे वाटप झाले. ३९ बीड लोकसभा मतदारसंघासाठी आतापर्यंत १० उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

३९ बीड लोकसभा मतदारसंघासाठी दि. १८ एप्रिल २०२४ रोजी अधिसूचना जारी करण्यात आली असून २५ एप्रिल २०२४ ही उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे. तर २६ एप्रिल२०२४ रोजी उमेदवारी अर्जांची छानणी करण्यात येणार आहे. २९ एप्रिल २०२४ ही अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. सोमवार दि. १३ मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. तर ४ जून रोजी मतमोजणी केली जाईल. निवडणूक आदर्श आचारसंहिता ६ जूनपर्यंत राहील.

# शरद पवार यांचा आशीर्वाद घेऊनच नवनीत राणा भाजपमध्ये; रवी राणा यांच्या विधानाने मोठी खळबळ

**अमरावती । प्रतिनिधी**

मला अमरावतीकरांची माफी मागायची आहे. माझ्याकडून एक चूक झाली. मागच्यावेळी झालेल्या निवडणुकीत मी येथील खासदाराला मतदान करण्याचं आवाहन केलं होतं. पण गेल्या पाच वर्षातील त्यांचा अनुभव काही चांगला नव्हता, अशा शब्दात माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी अमरावतीच्या भाजपच्या उमेदवार नवनीत राणा यांच्यावर टीका केली. पवार यांची ही टीका राणा कुटुंबीयांच्या चांगलीच जिव्हारी लागली आहे. शरद पवार यांचे आशीर्वाद घेऊनच नवनीत राणा भाजपमध्ये गेल्याचा खळबळजनक दावा आमदार रवी राणा यांनी केला आहे.

रवी राणा यांनी मीडियाशी संवाद साधताना हा दावा केला आहे. मागच्या




निवडणुकीत पवार साहेबांनी नवनीत राणांना पाठिंबा दिला. प्रचार करायला आले. शरद पवारांच्या आशीर्वादामुळेच नवनीत राणा खासदार झाल्या. शरद पवारांचा आशीर्वाद घेऊनच नवनीत राणा या भाजपमध्ये गेल्या. ज्या भाजपमध्ये नवनीत राणा गेल्या, त्या भाजपसोबत जाण्याची शरद पवारांची इच्छा होती, म्हणूनच त्यांनी अजित पवारांना त्यांनी पाठवलं, असा खळबळजनक दावा रवी राणा यांनी केला आहे.

### बच्चू कडू मीडिया प्रेमी

यावेळी त्यांनी बच्चू कडू यांच्यावरही टीका केली. बच्चू कडू हे मीडियाप्रेमी आहेत. मीडियामध्ये राहण्याची त्यांना सवय आहे. मोठ्या माणसाला विरोध करणे आणि टीआरपी मिळवणे त्यांना आवडते. मैदानासाठी आम्ही परवानगी मागितली. सर्व परवानगी आमच्याजवळ आहे. बच्चू कडू हे हिंदुत्वाच्या विचाराचा विरोध करतात, असा आरोप त्यांनी केला.

### विरोध फक्त ओठांवर

सुप्रिया सुळेंच्या हट्टापायी त्यांना थांबावं लागलं. शरद पवारांच्या मनामध्ये भाजप आहे. फक्त ओठावर विरोध आहे. शरद पवार साहेबांच्या मनामधील भाजपमध्येच नवनीत राणा आहेत. काँग्रेसच्या दबावामुळे आणि उद्धव ठाकरेंच्या दबावामुळे आज ते बोलले असतील, असा टोलाही राणा यांनी लगावला.

### उद्धव ठाकरेंनी बेईमानी केली

यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. संजय राऊत हे नाचोळे आहेत. उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदासाठी भाजप सोबत बेईमानी केली. अमरावतीमध्ये हिंदुत्वाला डिवचण्याचं काम उद्धव ठाकरे करत आहेत. उद्धव ठाकरेंचं खोटं हिंदुत्व उघड पडलेलं आहे, असंही ते म्हणाले.

# पंकजाताई मुंडे बुधवारी दाखल करणार उमेदवारी अर्ज

**बीड । प्रतिनिधी**

भाजप महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे येत्या बुधवारी २४ एप्रिल रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. यावेळी आयोजित रॅलीबद्दल पंकजाताई मुंडे यांनी सोशल मीडियावर शेअर केलेल्या एका व्हिडिओतून महायुतीच्या कार्यकर्त्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

२४ तारखेला उमेदवारी अर्ज दाखल करण्यासंदर्भात पंकजाताई मुंडे यांनी समाज माध्यमावर एक व्हिडिओ शेअर केला असून कार्यकर्त्यांना उद्देशून आवाहन केले आहे. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर दुपारी ३ वाजता पंकजाताई भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर,



### भाजप महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह

**बीड शहरात रॅली काढून महापुरुषांना करणार अभिवादन; माने कॉम्प्लेक्स येथे होणार जाहीर सभा**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करणार आहेत. यावेळी रॅली काढण्यात येणार आहे. रॅली साधेपणाने असली तरी गर्दी तर मोठी होणारच आहे. रॅली माने कॉम्पलेक्स येथे पोहचल्यानंतर त्याठिकाणी सभा होणार आहे. माने कॉम्पलेक्सचे मैदान सभेसाठी कमी पडेल असं सांगतानाच पंकजाताई मुंडे यांनी कार्यकर्त्यांना सूचना केल्या आहेत. आपल्या विरोधी उमेदवाराच्या विरोधात घोषणाबाजी करू नका, कोणाचाही अवमान होईल असं काही करू नये, स्टेजवर जास्त गर्दी करू नये, सर्वांनी शांततेत सहभागी व्हावे असे आवाहन पंकजाताईंनी केले आहे.

# जाहीरनाम्यावरुन वाद; खरगेंनी मोदींना भेटण्यासाठी मागितली वेळ

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटण्यासाठी वेळ मागितली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, खरगे पंतप्रधान मोदींना भेटून काँग्रेसचा जाहीरनामा त्यांच्याकडे सोपवतील आणि या जाहीरनाम्याची माहिती देतील. यासोबतच काँग्रेसच्या जाहीरनाम्याबाबत मतदारांची दिशाभूल करू नका, अशी विनंतीदेखील मल्लिकार्जुन खरगे पीएम मोदींना करणार आहेत. काँग्रेसने या महिन्याच्या पाच तारखेला लोकसभा निवडणूक २०२४ साठी आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला होता. काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्याला 'न्याय पत्र' असे नाव दिले आहे.



पक्षाने आपल्या जाहीरनाम्यात महिला, शेतकरी, बेरोजगारी आणि तरुणांविषयी अनेक घोषणा केल्या आहेत. मात्र पंतप्रधान मोदी आपल्या प्रचारसभेत सातत्याने काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर जोरदार टीका करत आहेत. नुकत्याच झालेल्या निवडणूक रॅलीत काँग्रेसच्या जाहीरनाम्याबाबत पंतप्रधान मोदींनी केलेल्या वक्तव्यावरुन वाद निर्माण झाला आहे. काँग्रेसनेही पंतप्रधान मोदींच्या वक्तव्याविरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार करण्याचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी राजस्थानमधील बांसवाडा येथे निवडणूक रॅलीला संबोधित करताना काँग्रेस सत्तेवर आल्यास लोकांच्या संपत्तीचे मुस्लिमांमध्ये वाटप करेल, असे म्हटले होते. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या सरकारने देशाच्या मालमत्तेवर पहिला हक्क मुस्लिमांचा असल्याचे म्हटले होते. ही शहरी नक्षलवादी मानसिकता आमच्या माता-भगिनींचे मंगळसूत्रही सोडणार नाही. काँग्रेसवाले सत्तेत आल्यावर घुसखोरांना संपत्ती वाटून देतील, असे पंतप्रधान मोदींनी सभेत सांगितले.

# सौदीच्या प्रिन्ससोबत बोलून हजचा कोटा वाढवला : मोदी

**अलीगड । वृत्तसेवा**

पूर्वी हजचा कोटा कमी असल्याने किती मारामार व्हायची, त्यातही लाचखोरी होत होती. केवळ श्रीमंत लोकांनाच हजला जाण्याची संधी मिळायची. मात्र आता हज कोटा वाढवण्याबरोबरच व्हिसाचे नियमही सोपे करण्यात आले आहेत, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यानी म्हटले आहे. ते सोमवारी अलीगडमध्ये हाथरस आणि अलीगड लोकसभेच्या उमेदवारांच्या समर्थनार्थ एका प्रचारसभेत बोलत होते. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुस्लीम मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला.



ते म्हणाले काँग्रेस आणि सपासारख्या पक्षांनी नेहमीच तुष्टीकरणाचे राजकारण केले. मुस्लिमांच्या उन्नतीसाठी काही केले नाही. मी जेव्हा पसमंदा मुस्लिमांच्या दुरवस्थेसंदर्भात बोलतो, तेव्हा त्यांना टेन्शन येते. मोदी म्हणाले पूर्वी हज कोटा कमी असल्याने त्यात लाचखोरी चालायची. केवळ श्रीमंत लोकांनाच हजला जाता येत होते. मी सौदी अरेबियाच्या क्राऊन प्रिन्सला विनंती केली होती की, भारतातील आमच्या मुस्लिम बांधवांसाठी हज कोटा वाढविण्यात यावा. आज, भारताचा हज कोटा तर वाढलाच, शिवाय, व्हिसा नियमही सोपे केले आहेत. सरकारने अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला. पूर्वी मुस्लीम माता-भगिनी एकट्याने हजला जाता येत नव्हते. आता सरकारने मेहरमाशिवाय हजला जाण्याची परवानगी दिली आहे. आज अशा हजारो भगिनी मला आशीर्वाद देत आहेत, ज्यांचे हजला जाण्याचे स्वप्न पूर्ण झाले.

### अलीगडमधील कर्फ्यूवर फुलस्टॉप

नरेंद्र मोदी म्हणाले, पूर्वी फुटीरतावादी कलम ३७० च्या नावाने अभिमानाने राहत होते. आमच्या सैनिकांवर दगडफेक करत होते. मात्र आता, भाजप सरकारच्या काळात याला पूर्णविराम मिळाला आहे. अलिगडमध्ये पूर्वी रोज कर्फ्यू असायचा, आता ते संपले आहे. हे योगी सरकारने आपल्याला करून दिले आहे. दंगली, हत्या, गँगवॉर, खंडणी हे सर्व सपा सरकारचा ट्रेडमार्क होता. हीच त्यांची ओळख होती, यावरच त्यांचे राजकारण चालत होते. मात्र, योगीजींच्या सरकारमध्ये, नागरिकांची शांतत बिघडवण्याची गुन्हेगारांची हिंमत नाही असेही मोदी म्हणाले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# मतदार जागृतीसाठी आयोजित भित्तीपत्रक प्रदर्शनाचे जिल्हाधिकारी कार्यालयात उद्घाटन

## युवकांनी उत्साहाने लोकशाहीच्या महाउत्सवात सहभागी व्हावे- विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार

**पुणे । प्रतिनिधी**

अभिनव कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मतदार जागृतीचा संदेश देण्यासाठी रेखाटलेल्या भित्तीपत्रक चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते करण्यात आले. युवकांनी मतदानाचा हक्क बजावून लोकशाहीच्या या महाउत्सवात सहभागी व्हावे आणि इतरांनाही मतदान करण्यासाठी प्रेरित करावे, असे आवाहन यावेळी डॉ.पुलकुंडवार यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालय व भारतीय कला प्रसारिणी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.सुहास दिवसे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर, स्वीप समन्वयक अधिकारी अर्चना तांबे, भारतीय कला प्रसारिणीचे पृथ्वीराज पाठक, प्राचार्य राहूल बळवंत उपस्थित होते.

डॉ.पुलकुंडवार म्हणाले, स्वातंत्र्यानंतर देशातील नागरिकांना मताधिकार मिळाल्याने मतदानाचा दिवस हा उत्सव साजरा करण्याचा दिवस आहे. प्रत्येक नागरिकाला लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होता यावे व पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये यासाठी निवडणूक आयोग प्रयत्नशील आहे. मतदानावेळी दिव्यांग, ज्येष्ठ नागरिकांना घरातून मतदानाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. नागरिकांनीदेखील लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचा दिवस हा सुट्टीचा दिवस म्हणून साजरा न करता लोकशाहीचा उत्सव म्हणून साजरा करावा. समाजामध्ये बदल घडविण्याची ताकद तरुण पिढीमध्ये असून नवमतदारांनी प्रत्येक निवडणुकीत मतदानाचा पवित्र हक्क बजवावा, असे आवाहन त्यांनी केले.



डॉ.पुलकुंडवार यांनी कलेच्या माध्यमातून समाजाच्या प्रत्येक घटकाला मतदानाचे आवाहन करणारे संदेश दिल्याबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या प्रदर्शनाला भेट देणाऱ्यांच्या मनात निश्चितपणे मतदान करण्याची भावना निर्माण होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. डॉ. दिवसे म्हणाले, कला हे प्रभावी माध्यम असल्याने कलेच्या माध्यमातून जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत प्रभावीपणे संदेश पोहोचविता येतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी तयार केलली भित्तीपत्रके मतदारजागृतीसाठी उपयुक्त ठरतील. प्रदर्शनात मांडण्यात आलेल्या चित्रांतून मतदानाचा संदेश अधिकाधिक मतदारांपर्यंत पोहोचेल. अन्य माध्यमांचा उपयोग करून ही कलाकृती विविध शासकीय कार्यालयात प्रदर्शित करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

सजग नागरिक होण्यासाठी विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमात सहभागी व्हावे, असे सांगून प्रत्येक पात्र मतदाराने येत्या १३ मे रोजी मतदानाचा हक्क बजवावा असे आवाहन डॉ. दिवसे यांनी केले. मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी जिल्हा प्रशासनाकडून स्वीप उपक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचेही ते म्हणाले. यावेळी स्वीप समन्वयक अधिकारी अर्चना तांबे यांनी मतदान जनजागृतीसाठी स्वीप मार्फत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तसेच भारतीय कला प्रसारणीचे श्री. पाठक यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी तसेच विद्यार्थी- विद्यार्थीनी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते भित्तीपत्रके तयार करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.

# सोयाबीन, गव्हाची चोरी करणारी टोळी जेरबंद : ८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**जुन्नर । प्रतिनिधी**

जुन्नर परिसरात शेतकर्यांच्या सोयाबीन व गव्हाची चोरी करणार्या टोळीला जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. या टोळीकडून तब्बल ५ हजार ६५० किलो वजनाचे ११३ सोयाबीन कट्टे व ८ गव्हाच्या कट्ट्यांसह ८ लाख ७९ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी ६ जणांना अटक केल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांनी दिली. नीलेश लक्ष्मण केवळ, साईनाथ विलास केवळ, रवींद्र गोरक्ष केवळ, राजेंद्र रामदास केवळ (सर्व. रा. निमदरी, ता. जुन्नर) तसेच सुनील मोहन काळे आणि रविराज विजय मोधे (दोघे रा. कुसुर, तलाखी, ता. जुन्नर) अशी चोरट्यांची नावे आहेत.



जुन्नर तालुक्यातील शेतकर्यांच्या सोयाबीन, गहू तसेच शेती साहित्याच्या चोरीप्रकरणी जुन्नर पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आले होते. गणेश केदार (रा. घोडेगाव फाटा, ता. जुन्नर) यांनीदेखील २४ मार्चला त्यांच्या वडगाव साहनी येथील फार्म हाऊसमधून सोयाबीनचे ३५ कट्टे चोरून नेल्याची फिर्याद दिली होती. या गुन्ह्यांचा तपास स्थानिक गुन्हे शाखेमार्फत सुरू होता. हे गुन्हे नीलेश केवळ, साईनाथ केवळ यांनी साथीदारांच्या मदतीने केल्याचे माहिती पोलिसांना मिळाली. तसेच हे सर्व जण त्यांच्या ताब्यातील पिकअप गाडीने सोयाबीन विक्री करण्यासाठी घोडेगाव फाटा येथे येणार असल्याची माहिती मिळताच गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा लावून पिकअपसह संशयितांना ताब्यात घेतले.

# भारत गायन समाजास आरती ठाकूर-कुंडलकर यांच्याकडून प्रभा अत्रे यांचे छायाचित्र भेट

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे भारत गायन समाज येथे अनेक दिग्गज, बुजुर्ग कलाकारांच्या स्मृती त्यांच्या छायाचित्रांच्या रूपाने जपण्यात आल्या आहेत. किराणा घराण्याच्या ज्येष्ठ गायिका, पद्मविभूषण स्वरयोगिनी प्रभाताई अत्रे यांच्या स्मृतीही जुन्या वास्तूत जपल्या जाव्यात या उद्देशाने प्रभाताई अत्रे यांचे छायाचित्र त्यांच्या ज्येष्ठ शिष्या आरती ठाकूर-कुंडलकर यांनी संस्थेच्या मानद अध्यक्ष शैलाताई दातार यांच्याकडे सुपुर्द केले.

देवगंधर्व पंडित भास्करबुवा बखले यांच्या १०२व्या पुण्यतिथीनिमित्त रविवारी आयोजित सांगीतिक मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. सांगीतिक मैफलीचे निमित्त साधून आरती कुंडलकर यांनी स्वरयोगिनी प्रभाताई अत्रे यांचे छायाचित्र संस्थेस भेट दिले. प्रभाताई यांच्या सहाय्यक डॉ. भारती दिदी यावेळी उपस्थित होत्या. सांगीतिक मैफलीत शैलाताई दातार, पंडित सुहास व्यास, आरती ठाकूर-कुंडलकर यांचे गायन झाले तर ऋजुता सोमण यांची कथक नृत्य प्रस्तुती झाली.

भावना व्यक्त करताना आरती ठाकूर-कुंडलकर




म्हणाल्या, जवळजवळ २३ वर्षे मी ताईंकडे संगीत साधना केली. शेवटच्या श्वासापर्यंत कार्यरत असणे म्हणजे काय हे प्रभाताईंचा सहवास मिळाल्यामुळे अनुभवायला मिळाले. प्रभाताई सुरात रमणाऱ्या कलाकार होत्या. संगीत साधना करीत असताना संवेदनशील कलाकार, संवेदनशील व्यक्ती प्रभाताईंच्या रूपाने पहायला मिळाल्या. संगीत क्षेत्रात आगामी काळात वाटचाल करीत असनाता त्यांचे आशीर्वाद लाभावे हीच प्रार्थना आहे.

# मेट्रो स्टेशनच्या साईटवर चोरी, चतु:शृंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

'पीएमआरडीए'च्या मेट्रो प्रकल्पाचे आणि स्टेशनचे काम गणेशखिंड रस्त्यावर सध्या सुरू आहे. येथील रिजर्व्ह बँक ऑफ इंडिया समोर स्टेशनचे काम सुरू आहे. याठिकाणी अज्ञात चोरट्यांनी चोरीचा प्रयत्न केला. त्यावेळी तेथील मेट्रोच्या कर्मचाऱ्यांनी या चोरट्यांना हटकले. तेव्हा आरोपींनी एकाला मारहाण करीत स्टीलच्या वस्तू चोरून नेल्या. ही घटना शनिवारी रात्री पावणेआठच्या सुमारास घडली. याप्रकरणी चतु:शृंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी कुणाल भारत रणसिंग (वय २२, रा. गाडीतळ, पोलीस चौकीमागे, मंगळवार पेठ) यांनी फिर्याद दिली आहे. कुणाल हे 'पीएमआरडीए' मेट्रोमध्ये काम करतात. ते ड्युटीवर असताना आरोपी तेथे मोटारसायकलवरुन आले. त्यांनी मेट्रोच्या बॅरिकेटमधून आतमध्ये प्रवेश केला. त्याठिकाणी पडलेल्या स्टीलच्या वस्तू उचलल्या. हा प्रकार लक्षात येताच फिर्यादीने त्यांना हटकले. त्यांच्याकडे 'इथून काय घेतले?' अशी विचारणा केली. त्यावेळी आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करीत हाताने तसेच लोखंडी रॉडने मारहाण केल्याचे फिर्यादीमध्ये नमूद करण्यात आले आहे

# रावेत पोलीस स्टेशन येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

रावेत पोलीस स्टेशन येथे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेंद्र कदम यांच्या हस्ते याचे उद्घाटन करण्यात आले. माऊली क्लिनिक, एफपीए, पीसीसीए, आदित्य बिर्ला यांच्या संयुक्त विद्यमाने. '१०६ वे मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिर संपन्न झाले. या शिबिरात ५० पोलीस कर्मचाऱ्यांची तपासणी करण्यात आली.

या शिबिरामध्ये मोफत हृदयरोग, मधुमेह, थायरॉईड, अस्थिरोग, त्वचा संबंधित तपासणी व उपचार करण्यात आले. त्याबरोबर रावेत पोलीस स्टेशन येथील सर्व अधिकारी व अंमलदार यांचे रक्त तपासणी यामध्ये सीबीसी, ब्लड ग्रुप, ईसीजी आदींसह विविध तपासणी करण्यात आली. पोलीसांना निरोगी आरोग्य आणि सशक्त जीवन जगता यावे म्हणून अशा प्रकारचे आरोग्य शिबीर सातत्याने आयोजीत करण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले.

डॉ. किरण जोशी व त्यांच्या सहकाऱ्यांनी वैदयकीय सेवा करत असतांना अशी शिबिरे आयोजित केली आहेत. समाजाचे ऋण फेडण्यासाठी अनाथाश्रम, विदयार्थी, सेवेकरी-वारकरी, साधु-संत पोलीस आदींसाठी १०५ मोफत आरोग्य शिबीर घेतले आहे. या सेवेसाठी डॉक्टर किरण जोशी यांना राज्यभरातील अनेक सेवाभावी संस्था संघटना यांनी विविध प्रकारचे राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरवण्यात आले असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

रावेत पोलीस स्टेशन येथील शिबीरासाठी डॉ. किरण जोशी, डॉ. शशिकांत व्यवहारे, डॉ. खानापुरकर, डॉ. अजित पाटील, डॉ. कैलास जोरुले यांनी तपासणी व मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजन मिलींद जोशी, रविंद्र पवार, सूरज पांढरे, योगेश सातपुते, मुक्ता नवानी,रोहिणी जोशी, नेहा जोशी, सुरज भंडारे, संजय मोरे यांनी केले होते. एपीआय राहुल कुंभार यांनी आभार मानले. या उपक्रमाचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक महेंद्र कदम, पोलीस निरीक्षक राहुल कुंभार, पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम चाटे यांनी कौतुक केले.

# जिल्ह्यातील सर्वात कमी मतदार असलेल्या दुर्गम मतदान केंद्र परिसरात मतदान माहिती चिठ्ठीचे वाटप

पुणे। प्रतिनिधी

भोरचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी राजेंद्र कचरे यांनी जिल्ह्यात भोर तालुक्यातील सर्वात कमी मतदार संख्या असलेले दुर्गम मतदान केंद्र बुरुडमाळ परिसराला भेट देवून येथील सर्व मतदारांना मतदार माहिती चिठ्ठीचे वाटप केले तसेच त्यांना मतदान प्रक्रीयेची आणि मतदान केंद्रातील सुविधांची माहिती दिली.

भाटघर धरणाच्या बॅकवॉटर परिसरातील बुरुडमाळ हे मतदान केंद्र अतिशय दुर्गम भागात असून हा परिसर डोंगरांनी व्यापलेला आहे. या मतदान केंद्रावर २१ पुरुष आणि २० महिला असे एकूण ४१ मतदार आहेत. श्री. कचरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सर्व मतदारांना मतदार माहिती चिठ्ठीचे आज वाटप केले. या मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा म्हणून येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत



## ८९ वयाचे बाबूराव आखाडे १९६० पासून प्रत्येक निवडणुकीत न चुकता करतात मतदान

मतदान केंद्र उभारण्यात येणार आहे. बुरुडमाळ येथील ८९ वयाचे बाबूराव आखाडे हे १९६० पासून प्रत्येक निवडणुकीत न चुकता मतदार केंद्रावर जाऊन मतदान करतात. श्री.कचरे यांनी त्यांची भेट घेतली आणि त्यांनाही प्रत्येक निवडणुकीप्रमाणे या निवडणुकीतदेखील मतदान करण्याचे आवाहन केले. आखाडे यांनीदेखील आपण मतदान केंद्रावर येवून मतदान करणार असल्याचे सांगितले.श्री.आखाडे यांचा आदर्श समोर ठेवून नवमतदारांनी आपले पहिले मतदान करावे आणि लोकशाहीच्या उत्सवात सहभागी व्हावे असे आवाहन श्री.कचरे यांनी केले आहे.

# खंडणी न दिल्यामुळे गोळीबार; एकाचा मृत्यू

**पुणे/ येरवडा । प्रतिनिधी**

येरवड्यातील गोळीबारात जखमी झालेल्या हॉटेलचालकाचा रविवारी पहाटे उपचारादरम्यान मृत्यू झाला. विकी राजू चंडालिया (वय २८, रा. जय जवाननगर, येरवडा) याचा ससून रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. गुरुवारी मध्यरात्री एकच्या सुमारास विकी याच्यावर सराईत गुन्हेगार आकाश चंडालिया व त्याच्या साथीदारांनी खंडणी न दिल्यामुळे गोळीबार केला होता. यामध्ये विकी गंभीर जखमी झाला होता. सुरुवातीला त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार करून एक शस्त्रक्रिया करण्यात आली होती. त्यानंतर प्रकृती अधिक खालावल्यामुळे त्याला पुढील उपचारासाठी ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले.

या ठिकाणीदेखील आणखी एक शस्त्रक्रिया त्याच्यावर करण्यात आली. दरम्यान, रविवारी पहाटे चारच्या सुमारास उपचार सुरू असताना विकी याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेत येरवडा पोलिसांनी पूर्वीच पाच आरोपींना अटक केलेली आहे. मुख्य आरोपी आकाश हादेखील जखमी असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत. गुन्ह्यातील एक आरोपी फरार असून, त्याचा शोध पोलिस घेत आहेत.

विकी याच्या पश्चात आई-वडील व लहान बहीण, भाऊ असा परिवार आहे. विकी याच्या मृत्यूनंतर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी ससून रुग्णालयात, तसेच त्याच्या घराजवळ बंदोबस्त नेमला आहे. पुढील तपास येरवडा पोलिस करीत आहेत.

विकी चंडालिया आणि आकाश चंडालिया हे लहानपासूनचे मित्र होते. आकाश चंडालिया याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल होता. त्या गुन्ह्यात तो बरीच वर्षे कारागृहात होता. सहा महिन्यांपूर्वी तो कारागृहातून जामिनावर सुटला होता, तर विकी हा हॉटेलचे काम पाहत होता. दि. १० एप्रिल रोजी आकाश हा विकीच्या हॉटेलवर आला. त्याने विकीला हॉटेल चालवायचे असेल, तर तुला पैसे द्यावे लागतील म्हणत खंडणीची मागणी केली. त्या वेळी विकीने पैसे देण्यास मनाई केली व सर्व प्रकार मस्करीत घेतला.

हा सर्व प्रकार विकीने त्याच्या घरी सांगितला. आकाश त्याचा लहानपणीचा मित्र असल्याने आपापसात वाद मिटतील म्हणून त्याने आकाशविरोधात खंडणीची तक्रार दिली नाही. त्यानंतर आकाशने त्याच्या साथीदारांच्या मदतीने विकीवर गोळ्या झाडल्या. रविवारी त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. जर विकीने त्याच दिवशी तक्रार दिली असती, तर आज विकी वाचला असता, असे बोलले जात आहे.

# जलवाहिनी फुटल्याने पाण्याचा अपव्यय

**विश्रांतवाडी । प्रतिनिधी**

विश्रांतवाडी-फाइव्ह नाइन रस्ता सिमेंटचा करण्यासाठी सध्या खोदकाम सुरू असल्याने जलवाहिन्या फुटण्याच्या घटना घडत आहेत. यामुळे पाणीटंचाईच्या दिवसांत पाण्याचा अपव्यय होत असून, पाणीपुरवठाही विस्कळीत होत असल्याने नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. दरम्यान, रविवारी जलवाहिनी फुटल्याने होणारा पाण्याचा अपव्यय जागरूक नागरिकांच्या सतर्कतेमुळे टळला.

विद्यानगर येथील गल्ली क्रमांक चार व पाचमध्ये रविवारी सकाळी दोन ठिकाणी पाणीगळती होत होती. रस्त्यावर पंधरा ते वीस फुटांचा पाण्याचा फवारा उडत होता. यामुळे शेकडो लिटर पाणी वाया जात होते. गल्ली क्रमांक चार येथील वळणावर फुटलेली जलवाहिनी तर एक फूटभरही खोल गाडलेली नाही. जलवाहिनी इतक्या कमी खोलीवर कशी गाडली गेली, याबाबत नागरिक प्रश्न उपस्थित करीत आहेत.

स्थानिक रहिवासी कपिल गायकवाड यांनी रविवारी सकाळी जलवाहिनी फुटल्याने पाण्याचा अपव्यय होत असल्याची माहिती दै. 'पुढारी'च्या प्रतिनिधीला दिली. त्यानंतर दै. 'पुढारी'च्या प्रतिनिधीने पाणीपुरवठा विभागाचे अधीक्षक अभियंता इंद्रभान रणदिवे यांना पाण्याचा अपव्यय होत असल्याचे कळविले. त्यानंतर कनिष्ठ अभियंता केतन जाधव यांनी पाणीगळती होत असलेल्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन पाणीपुरवठा बंद केल्याने पाण्याचा अपव्यय टळला. यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# वाहतूक कोंडीमुळे नागरिकांचे हाल; सिंहगडावर पर्यटकांची संख्या रोडावली

**खडकवासला । प्रतिनिधी**

खडकवासला धरण चौपाटीवरील बेशिस्त खाद्यपदार्थ विक्रेते व रस्त्यावरच वाहने उभी करून मौजमजा करणार्या उन्मत्त पर्यटकांमुळे रविवारी पुणे-पानशेत रस्त्यावरील वाहतुकीचा फज्जा उडाला. वाहतूक कोंडीचा फटका लष्कराच्या अधिकार्यांसह नागरिकांना बसला. सायंकाळी उशिरापर्यंत धरण चौपाटीच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या दूर अंतरावर रांगा लागल्या होत्या. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हवेली पोलिसांनी खडकवासला धरण चौकात नाकाबंदी सुरू केली आहे. तेथे पोलिस तैनात आहेत.




धरणतीरावरील मुख्य पानशेत रस्त्यावरच थाटलेल्या चौपाटीवर पर्यटकांनी गर्दी केल्याने प्रचंड वाहतूक कोंडी झाली. खडकवासला जलसंपदा विभागाचे सुरक्षारक्षक वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी धावपळ करीत होते. मात्र, बेशिस्त पर्यटक आणि विक्रेत्यांमुळे तेही हतबल झाल्याचे चित्र दिसून आले.

दिवसभर पावसाळी वातावरण होते. शनिवारी (दि. २०) पडलेल्या जोरदार पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाला आहे. सिंहगड घाट रस्त्यावर जोरदार वादळी पावसामुळे झाडाच्या फांद्या कोसळल्या होत्या तसेच ठिकठिकाणी मुरूम-माती वाहून आली होती. वन विभागाने फांद्या, मलबा काढून घाट रस्त्याची सफाई केली. पानशेत, वरसगाव धरण परिसरात पर्यटकांची वर्दळ वाढली आहे. सिंहगडावर मात्र पर्यटकांची संख्या रोडावली आहे. दिवसभरात पर्यटकांची ३२१ चारचाकी व ५६४ दुचाकी वाहनांची नोंद झाली. राजगड, तोरणा किल्ल्यावरही पर्यटकांची संख्या रोडावल्याचे चित्र दिसून आले.

# कात्रज घाटात कचरा! दुर्गंधीमुळे प्रवासी त्रस्त

**कात्रज । प्रतिनिधी**

पुणे शहराचे दक्षिण प्रवेशद्वार असलेल्या व निसर्गसौंदर्याने नटलेल्या कात्रज घाटात कचरा आणि राडारोड्याचे ढीग साचल्याने परिसराचे विद्रूपीकरण झाले आहे. धनकवडी-सहकारनगर क्षेत्रीय कार्यालयाच्या आरोग्य विभागाकडून कात्रज घाटाची स्वच्छता केली जात असली, तरी कचरा कमी होत नसल्याचे चित्र दिसून येत आहे. या ठिकाणी कचरा व राडारोडा टाकणार्यांवर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी प्रवासी व नागरिकांकडून होत आहे. वाहनचालक, प्रवासी तसेच नागरिकांनी घाटात कचरा टाकू नये, यासाठी महापालिकेने कर्मचार्याची नेमणूकही केलेली असताना घाटात कचरा टाकण्याचे प्रकार बंद झालेले नाहीत. या ठिकाणी कचरा टाकणार्यांवर कारवाई करण्यासाठी महापालिकेने मोहीम हाती घेतली आहे. त्यानुसार कचरा टाकणार्यांना जागेवर पकडून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जात आहे. मात्र, घाटात रात्रीच्या वेळी कचरा व राडारोडा आणून टाकण्यात येत आहे. यामुळे दुर्गंधी पसरत असल्याने प्रवासी व परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. हॉटेलमधील टाकाऊ अन्न, बांधकामाचा राडारोडा, थर्माकॉल, प्लास्टिकसारखा कचरा रात्रीच्या वेळी घाटात आणून टाकला जात आहे. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत आहे.



तसेच राडारोड्यातील माती, दगड व विटा रस्त्यावर येत असल्याने दुचाकी घसरून अपघातही होत आहे. रात्रीच्या वेळी घाटात पोलिसांची गस्त असते. त्यामुळे पोलिसांनीही घाटात कचरा टाकणार्यांवर कारवाई करावी, अशी अपेक्षा महापालिका प्रशासनाकडून व्यक्त होत आहे.